(22) 10th Feb. 2024 Ladhidevi Ramdhar Maheshwari night College of Commerce, Malad, NSS Camp at Chandika Mata Mandir, Wakipada, Juchandra, Naigaon beyond Bhayander (W.R.) at 10.30 a.m. Sub Dowry Prohibition Act 1961.

(23) 9th March 2024 webinar on Sexual Harassment of women at workplace (Prevention, prohibition and Redressal) Act 2013 at Randhirsingh Bhadoriya Mahavidyalaya, Umred, Dist Nagpur.

(24) 9th March 2024 Graceful Hands at Panvel Women's Day function (25) 12th March 2024 Women's Day function Asha Kulkarni address the representatives of 18 Branches of All India Women's Conference Sub : Importance of Legal Awareness among women.

Ms. Asha Kulkarni, our General Secretary has the honor to be nominated on various Committees in Government Offices, Banks, Private Companies and Degree Colleges. She is working as Social Worker (NGO) Representative External Member.

## Late Mrs. Radhabai Kulkarni Smruti Puraskar.

It was decided to commemorate the MEMORY of LATE (Mrs.) RADHABAI KULKARNI, Founder Life Member of the Movement, and wife of our President Shri Mamasaheb Kulkarni, who not only consented to use her Residence as the OFFICE of ANTI DOWRY MOVEMENT since 1973 but also played a major and important role in giving solace to women in distress. This AWARD which is named as "Late Mrs. Radhabai Kulkarni Smruti Puraskar (Vidhayak Karyakarti) is given EVERY YEAR on District Level to such a Woman, who has dedicated her life of Social Cause especially from Rural Area at Remote Place. The main aim behind announcing this Award is to develop an effective Networking of Social Workers / Organizations working for Capacity building and Empowerment of Girls & Women for the better future of our Nation. JALGAON District was selected for the First Year

(1) First year (2008-09) and the Award Winner was Prof. Sheela Patil from Amalner, Dist. Jalgaon,

(2) Second Year (2009-10) Ahmednagar District and the Award Winner was Dr. Sudha Kankaria,

(3) Third Year (2010-11) Akola District and the Award Winner was Advocate Sangeeta Bhakre – practicing Lawyer from District Court Akola.

(4) Fourth Year (2011-2012) Amravati District and the Award Winner was Smt. Nalini Phuse – working on the burning issue of malnutrition of Adivasi children in Melghat area of Amravati District.

(5) Fifth Year (2012-2013) Aurangabad District and the Award was given to Dr. Rashmi Borikar.

(6) Sixth year (2013-14) Beed District and the Award was given to Prof Savita Shete.

(7) Seventh year (2014-15) Bhandara – Gondia Dist. and the award was given to Dr. Tejaswini Bhuskute from Amgaon, Dist.. Gondia.

(8) Eighth Year (2015-16) Buldhana Dist. Dr. Indumati Lahane.

(9) Ninth Year (2016-17) Chandrapur District : An Activist, Lawyer, and Social Worker Dr. Paromita Goswami She is successful in making the Chandrapur District Addiction Free and stopped completely the sale and consumption of Liquor in the entire District.

(10) Tenth Year (2017-18) Dhule District : Social Worker Smt. Meena Bhosle for her remarkable contribution in Women Empowerment through SHG and Bachat Gat.

(11) Eleventh year (2018-19) Gadchiroli District : Social Worker Smt. Shubhada Deshmukh for her remarkable contribution in the field of Women Empowerment.

(12) Twelfth year (2019-20) Jalna District : Social Worker Advocate Smt. Kalpana Tribhuvan for her remarkable contribution in the field of Women's Safety and empowerment.

Due to lockdown Awards were not given in the year 2020-21 & 2021-22.

(13) Thirteenth year (2022-23) Kolhapur District : Social Worker working on the subject of Child Abuse and Sexual Harassment for her remarkable contribution in the field of Child Safety and Women's empowerment, Mrs. Rajashree Sakle.

(14) Fourteenth year (2023-24) Latur District : Social Worker working on the victims of Domestic Violence and Sexual harassment at workplace, Adv. Sujata Mane Kendre.

In the forthcoming years Districts will be taken alphabetically. Selection Committee consisting of Managing Committee members select the awardees. Nature of Award is : Cash Rs.10,000/-, Citation, Award Memento, & Saree be given to the Award winner. This award is given by the financial support from Daughters of Late Mrs. Radhabai Kulkarni.



जग कधीच तुमच्या स्वाभिमानाची पर्वा करत नाही. अभिमान बाळगण्याआधी स्वत:ला सिध्द करून दाखवा.

**– डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम**

## Smt. Shakuntala Parelkar Sevavrati Doctor Puranskar.

During the F. Y. 2015-16 it was decided to commemorate the memory of Late Smt. Shakuntala Parelkar, beloved Mother of Dr. (Mrs) Rashmi Fadnavis our Jt.Treasurer by honoring one social worker from medical profession. Nature of Award is : Cash Rs.10,000/-, Citation, Award Memento.

(1) First year (2015-16) of this Award Dr. Surekha Dhurandhar from Vile Parle was honored at the hands of Dr. Snehalata Deshmukh our Trustee, on the occasion of our 42nd Anniversary.

(2) Second Year (2016-17) Dr. Nilkanth Phadke from Karjat was honored on the occasion of 43rd Anniversary on 29th May 2016.

(3) Third Year (2017-18) Dr. Arun Ramchandra Patil from Dombivali a dedicated Doctor who works for Adivasis for more than 25 years was honored on the occasion of our 44th Anniversary on 28th May 2017

(4) Fourth Year (2018-2019) Dr. Vishwas Sapatnekar from Thane was honored for his dedicated Medical Social Service in Rural area of Thane Districtfor more than 3 decades.

(5) Fifth year (2019-2020) Dr. Bharati Kondvilkar from Borivali, was honored for her dedicated Medical Social Service after her retirement from J.J. Hospital.

Due to lockdown Awards were not given in the year 2020-21 & 2021-22.

(6) Sixth Year (2022-23) Dr. Ashish Deshpande, Vileparle (E) Mumbai, an leading Psychiatrist from Vileparle who is one of the key persons from Alcoholic Anonymous in India.

(7) Seventh year (2023-24) Dr. Ragini Parekh, an eye surgeon who performed more than 70,000 cataract operations in various eye camps in rural area.

## Sane Guruji Adarsh Shikshak Puraskaar

From year 2019 - 2020 we are honouring one Ideal Teacher in the memory of our Founder Late Shri D. B. alias Mamasaheb Kulkarni with Sane Guruji Adarsh Shikshak Puraskaar. First year the award was given to Shri Heramb Kulkarni, from Dist Ahmednagar. Nature of Award is : Cash Rs.10,000/-, Citation, Award Memento. This year Dr. Rashmi Fadnavis and Asha Kulkarni contributed for the expenses of this award.

Due to lockdown Awards were not given in the year 2020-21 & 2021-22.

Second year of this Award (2022-23) : The Award was given to Shri Matin Bhosle, from Amravati. (Prashnachinha Nivasi Aashram Shala at Amravati.)

Third year of this Award (2203-24) : The Award was given to Shri Umesh Ghevrikar from Shevgaon, Dist. Ahmednagar, a teacher with innovative ideas to teach difficult subjects to school students.

## Sane Guruji Yuva Puraskaar and Yuva Vaidnyanik Puraskaar

Since January 2013 which was the centenary year of our beloved founder Shri D.B. alias Mamasaheb Kulkarni we introduced the above Youth Award to be awarded to young achievers on the occasion of YOUTH DAY. Since 2013 we have given 22 such awards and brought the achievements to light. This year's achievers are two young girls (1) Lt. Apurva Gite (Dombivali) : The fourth lady Pilot of Indian Navy and the first ever lady Navy Pilot from Maharashtra (2) Shweta Barve (Sindhudurg) : who successfully made eco-friendly slippers from Betel nut wastes and secured a patent for the same.

## ACKNOWLEDGEMENT

We are very much grateful to our Donors, Sympathizers, our Computer Service Providers : M/s S. R. Systems (Shailesh Limaye and Rajendra Tambe.) M/s. Subodh Typewriters for Typing and Xerox work, Government of Maharashtra, Women & Child Development Department, VIPs who have honoured us by sending their Messages. Sathaye College, Vile Parle for providing us Hall and Canteen facility. Purnima Narvekar and Chandrasen Salvi of Nihar Graphics for their assistance in DTP work of our Annual Report, Saurabh Karve for updating our website. Printers M/s Impression Graphic Shri Nitin Soman for printing our 50th Annual Report and our both the publications in Marathi as well as Merit and participation certificates for various competitions and Anti Dowry Rally. Special thanks to Sudhakar Raikar who prepared Vedio clips of VIPs on the occasin of our Golden Jubilee year and also for screening the same on the occasion of YOUTH DAY on 12th January 2024. Shri Devendra Bhujbal – Former Director, Information and Public Relations Government of Maharashtra, for giving wide publicity to all our activities such as Inter Collegiate various competitions as well as our State Level open essay writing competition and other various functions through his web portal viz. News Story Today. We are thankful to the Examiners of our State Level Open Essay Competition and State Level Inter Collegiate Elocution Competitions, also all Colleges those who helped us by participating in the Anti Dowry Rally in huge numbers and making our various educational programs successful.

## APPEAL

Though offering - accepting and demanding DOWRY is an offence, there are reports of increasing dowry demands, particularly by those having permanent government jobs that have 'lucrative' prospects. In view of this fact we appeal to the Centre and State Governments to consider and frame appropriate rules for male employees which will prevent them from glorifying this age old and ugly custom. We also appeal to both Centre and State governments to obtain written oath in this regard from all male employees which should be signed by them along with their wives, parents and parents-in-law and this should be made compulsory. Concerned authorities should also find out whether dowry if taken by those male employees already employed has been handed over to the wife as contemplated by section 6 of the Dowry Prohibition Act. We also appeal to the concerned authorities to take strict action against those male employees against whom cases are pending in the court related to dowry demands etc.

It is high time for every right thinking person to decide that unless massive moral pressure is built up in the form of National Movement to eliminate this Evil, it is unlikely to disappear from our midst. The youth have special role to play in the Movement. We appeal to all, to associate with us in uprooting this Social Evil.

Mumbai : 1st May, 2024.

Asha Kulkarni

Hon. General Secretary.



# हुंडाविरोधी चळवळ, मुंबई

**स्थापना : १ मे १९७३**

## एकावन्नावा वार्षिक अहवाल

हुंडाविरोधी चळवळीला ५१ वर्षे झाली. मागील वर्षी म्हणजेच १ मे २०२३ रोजी सुवर्ण महोत्सवी वर्ष संपन्न झाले. अर्थात ही बाब काही आनंदाची किंवा उत्सव साजरा करावा अशी अजिबात नाही. खऱ्या अर्थाने या अनिष्ट प्रथेचा अंत कधी होईल ते काळच जाणे. संस्थेची सुरुवात १ मे १९७३ रोजी स्वातंत्र्य सैनिक मामासाहेब कुलकर्णी यांच्या पुढाकाराने झाली. चळवळ सातत्याने हुंडा व तत्सम दुष्ट रूढी परंपरां विरोधात तसेच अंधश्रध्दा विरोधात जनजागृती व लोकशिक्षणाचे कार्य विविध शैक्षणिक उपक्रमांद्वारे करीत आहे.

आधी स्वातंत्र्य की आधी सामाजिक परिवर्तन या मूलभूत वादात स्वातंत्र्यपूर्व काळात भारतातील नेते मंडळींनी आधी स्वातंत्र्याची बाजू घेतली आणि सामाजिक परिवर्तनास दुय्यम स्थान दिले ते आजतागायत ! सामाजिक परिवर्तनाकडे आपणा सर्वांचेच दुर्लक्ष झाले. समाज विघातक प्रवृत्तींनी याचा पुरेपूर फायदा उठवला आणि जमेल तसे भारतीय समाजमन पोखरून काढले. ज्याचे परिणाम आज आपण सर्वजण भोगतो आहोत. समाज परिवर्तनाची लढाई ही स्वातंत्र्याच्या लढाई पेक्षा कितीतरी पटीने अवघड अशी लढाई आहे. सामाजात काही मोजकेच ''सुधारणा सैनिक'' ही लढाई आपले सर्वस्व पणाला लावून लढताना दिसतात. अशाच सैनिकांच्या एका तुकडीने सामाजिक प्रबोधनाद्वारे हुंडा प्रथेविरुद्ध जनमानस संघटित करण्याच्या उद्देशाने विलेपार्ले येथील सुपरिचित स्वातंत्र्य सैनिक कै. दामोदर बळवंत कुलकर्णी आणि त्यांच्या पत्नी कै. सौ. राधाबाई यांच्या मार्गदर्शनाखाली ५० वर्षांपूर्वी म्हणजे १ मे १९७३ रोजी हुंडाविरोधी चळवळीला सुरुवात केली आणि पहिली १० वर्षे संपूर्ण महाराष्ट्रात फिरून आपल्या उद्दिष्टांचा परिचय देऊन आर्थिक पाठिंबा जनतेकडून स्वीकारण्यासाठी संस्था १९८३ साली धर्मादाय आयुक्तालयाकडे नोंदणीकृत केली.

भारतात अनेक दुष्ट रूढी परंपरा आजही अस्तित्वात आहेत. त्यातच ''हुंडा'' ही एक दुष्ट रूढी असून एक ज्वलंत सामाजिक समस्या बनली आहे. हुंडा दिला नाही किंवा कमी दिला म्हणून नवविवाहितेला रॉकेल टाकून जाळल्याच्या बातम्या आजही वाचायला मिळतात. एकविसाव्या शतकातही आपला समाज बुरसटलेल्या विचारांतून बाहेर पडला नसल्याने खंत वाटते. काळाबरोबर हुंड्याच्या मागण्यांमध्ये बदल झाला परंतु मागण्या आहेतच. या दुष्ट रूढींच्या विळख्यातून स्त्रीला सोडवण्याच्या उद्देशाने शासकीय पातळीवर प्रयत्न झाले आणि १९६१ साली ''हुंडा प्रतिबंधक कायदा'' पारित करण्यात आला. तरीही आज आपल्या देशात अंदाजे ५० मिनिटाला एका हुंडाबळीची नोंद होते, तीही अधिकृत. महाराष्ट्राचे तत्कालीन राज्यपाल चे. विद्यासागर राव यांच्या संदेशानुसार २०१२ ते २०१४ या दोन वर्षात भारतात २४७७१ हुंडाबळींची अधिकृत नोंद झाली आहे. तसेच राष्ट्रीय गुन्हे अन्वेषण विभागाच्या अहवालानुसार २०२१ मध्ये आपल्या देशात दररोज २० तरुण विवाहितांना हुंड्यापायी जीव गमवावा लागला आहे. त्या वर्षात ७००० (सात हजार) हुंडा बळींची नोंद आहे, आणि हुंड्यासाठी छळ व मारहाण केल्याच्या १,११,५४९ तक्रारींची नोंद आहे. त्याच वर्षी म्हणजेच १ जुलै २०२१ रोजी हुंडा प्रतिबंधक कायद्याला ६० वर्षे पूर्ण झाली, परंतु शासन आणि प्रशासनाच्या बोटचेप्या धोरणांमुळे कायद्याची अंमलबजावणी प्रभावीपणे होत नाही.

या पार्श्वभूमीवर हुंडाविरोधी चळवळीचे कार्य महत्वाचे ठरते. तसे पाहिले तर ज्या उद्दिष्टांनी चळवळीला सुरुवात झाली ते हुंडा निर्मूलनाचे उद्दिष्ट अद्याप साध्य झालेले नाही त्यामुळे सुवर्ण महोत्सव आनंदाने साजरा करण्यासारखी परिस्थिती अजिबात नाही. उलट जबाबदारी वाढली आणि म्हणून अधिक जोमाने काम करावे लागणार आहे.

पहिली दहा वर्षे संस्थेचा संपूर्ण आर्थिक भार संस्थापक मामासाहेब कुलकर्णी आणि कुटुंबीयांनी समर्थपणे पेलला. महाराष्ट्रभर चळवळीचा संदेश पोचविण्यासाठी झंझावाती प्रचार दौरे काढले. या प्रचार दौऱ्यांना तरुण पिढीकडून, शैक्षणिक संस्थाकडून, नागरिकांकडून उत्तम प्रतिसाद मिळाला. महाराष्ट्रात ठिकठिकाणी चळवळीची केंद्रे स्थापन झाली. मार्च १९८३ मध्ये चळवळ नोंदणीकृत झाली. तेव्हापासून चळवळ समाज प्रबोधनास व जनजागृतीच्या शैक्षणिक कार्यास प्राधान्य देत असून त्या साठी विविध उपक्रम राबविले जात आहेत.

## हुंडा पध्दती आणि चमत्कारीक मानसिकता

हुंडा पध्दती ही स्त्री पुरुष समानतेच्या तत्वाशी विसंगत आहे. अजूनही स्त्रीला समाज माणूस म्हणून किंमत देत नाही. ती केवळ एक उपयोग्य वस्तू म्हणून गणली जाते. तिला केवळ शरीर आहे मन नाहीच ही विचारसरणी सर्वसाधारणपणे आढळते. ही मानसिकता भयानकच म्हणावी लागेल. ही चमत्कारीक मानसिकता बदलण्याचे एक फार मोठे आव्हान आज तरुण पिढीसमोर आहे. एकविसाव्या शतकातही परिस्थिती बदलली नाही.

## सद्यस्थिती

भारताच्या राज्य घटनेत जरी स्त्री पुरुष समानतेच्या तत्वाचा पुरस्कार केला असला तरी प्रत्यक्षात स्त्री पुरुषांच्या विवाह प्रसंगी मुलीकडची बाजू कनिष्ट आणि मुलाकडची बाजू श्रेष्ठ असेच मानले जाते. मुलाला आणि मुलीला दोघांनाही विवाहाची गरज असूनही मुलीलाच गरजवंत मानले जाते. आणि दोन्ही कडचा खर्च तसेच दागदागिने, भेट वस्तू, मालमत्ता या आणि अशा अनेक स्वरुपात हुंडा वराकडची मंडळी वधूपित्याकडून उकळतात. असा हुंडा दिला नाही किंवा पुरेसा हुंडा मिळाला नाही, मनासारखे मानपान झाले नाही इ. कारणांवरुन विवाहीत स्त्रियांचा सासरी नवऱ्याकडून, सासूकडून व सासरकडच्या इतर मंडळींकडून छळ होतो. तिला मानसिक व शारीरिक क्लेश दिले जातात, उपाशी कोंडून ठेवले जाते, मारहाण केली जाते, प्रसंगी जाळून खून केला जातो. अशी हुंडा बळींची संख्या दिवसे दिवस वाढतच आहे. नोंद न झालेल्या अशा हजारो घटना असतील. राज्यांची तुलना केल्यास महाराष्ट्रात परिस्थिती मध्ये थोडी सुधारणा दिसून येते. तरी महिलांविरुध्दच्या गुन्हयांपैकी सुमारे ८३ टक्के गुन्हे पतीने किंवा अन्य नातेवाईकांनी तसेच परिचितांनी केलेल्या अत्याचाराचे असतात गेल्या ५० वर्षात हुंडाबळींची संख्या कमी होण्याऐवजी वाढतच आहे या परिस्थितीत चळवळीची जबाबदारी अधिकच वाढते. काम अधिक जोमाने करावे लागणार आहे.

हुंडा प्रतिबंधक कायदा अगदी कडक आहे परंतु त्याची कडक अंमलबजावणी मात्र होतांना दिसत नाही. शासकीय यंत्रणेच्या दृष्टीने कायद्याची अंमलबजावणी करणे अत्यंत कठीण तर काही वेळा दुरापास्तच. नॅशनल क्राईम रेकॉर्डस ब्युरोच्या अहवालानुसार हुंडाबळी प्रकरणांत ८६ टक्के गुन्हेगार पुराव्या अभावी निर्दोष सुटतात. गुन्हा कितीही गंभीर वा क्रूरपणे केलेला असो पुराव्या अभावी करण्यात आलेले आरोप सिध्द होऊच शकत नाहीत.

आरोपीला संशयाचा फायदा देऊन निर्दोष सोडावे लागते. विवाहितेचा छळ पाहिल्याचा प्रत्यक्ष पुरावा न्यायालयासमोर येत नाही. कायदा पुरावा मागतो. तिचा छळ उघडपणे इतरांसमक्ष करण्याची शक्यता कमी असते. तसेच ती आत्महत्या कोणाच्या साक्षीने करण्याची शक्यताच नसते. बऱ्याच वेळा मृत्यू एखाद्या अपघाताने झाला किंवा आत्महत्या होती याचा पुरेसा पुरावा उपलब्ध होत नाही. एखाद्या स्त्रीने जाळून घेऊन आत्महत्या केली की तिची साडी अपघाताने पेटली वा तो घातपात होता याचा स्पष्ट पुरावा उपलब्ध होणे आवश्यक असते. उदा. एखाद्या महिलेने विहीरीत उडी मारुन आत्महत्या केली, की ती पाय घसरुन अपघाताने विहीरीत पडली, की तिला धक्का देऊन कोणी विहीरीमधे ढकलले, की हत्या करून मृतदेह विहीरीत टाकला याचा स्पष्ट पुरावा उपलब्ध होत नाही अशा परिस्थितीत आरोपीला संशयाचा फायदा मिळतो आणि हुंड्यासाठी एका निरपराध महिलेचा जीव घेऊनही आरोपी स्वतः नामानिराळा असतो व निर्दोष सुटतोही! त्यानंतर लगेचच दुसरे लग्न करुन आणखी एका स्त्रीकडून हुंडा उकळायला मोकळा!

अनेकवेळा छळाच्या व्याख्येत बसण्याइतक्या पुराव्याअभावी न्यायालयही हतबल असते. परंतु आता नवीन कायदा झाल्यापासून कौटुंबिक छळाची नवी व व्यापक अशी व्याख्या करण्यात आली आहे. या नव्या कायद्याचा थोडा दिलासा पिडीत महिलांना आहे.

हा कौटुंबिक हिंसाचार रोखण्यासाठी असलेल्या कायद्यानुसार आता अत्याचार करणाऱ्या महिला व १८ वर्षाखालील मुलेसुद्धा कारवाईला पात्र असतील अशा आशयाचा निकाल नुकताच सर्वोच्च न्यायालयाने दिला असून कौटुंबिक हिंसाचार व छळवाद करणाऱ्या सर्वच व्यक्ती कायद्याच्या नजरेत दोषी असतील. या महत्त्वपूर्ण निकालामुळे कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंध कायद्यातील पळवाटा बंद झाल्या आहेत. पूर्वी या कायद्याखाली घरातील प्रौढ पुरुषांवरच कारवाई होत असे आणि छळवाद करणाऱ्या दुष्ट महिला व मुली आरोपातून सुटत, आता त्यांच्यावर अंकुश असेल.

तसेच हुंडा प्रतिबंधक कायद्यानुसार हुंड्याची मागणी करणे सुद्धा शिक्षेस पात्र गुन्हा असून दोषी व्यक्तीला कारावास आणि दंडास सामोरे जावे लागते परंतु कायद्याविषयी अनास्था असल्याने त्याचा प्रभावी वापर होत नाही. परंतु हळूहळू जनजागृति होत असून, साखरपुडा झाल्यानंतर वधु पक्षाकडे हुंड्याची मागणी करुन अडवणूक करणाऱ्या व लग्न मोडणाऱ्या नवरदेवासह इतर कुटुंबीयांना कारावास व दंडाची शिक्षा भोगावी लागल्याची उदाहरणे सुद्धा समोर येत आहेत.

न्याय व्यवस्था अतिशय संवेदनशील असल्याचीही अनेक सकारात्मक उदाहरणे समोर येत आहेत. हुंडा प्रतिबंधक कायद्याअंतर्गत दाखल गुन्हा व हुंड्याची मागणी पूर्ण न झाल्याने अनन्वीत छळ करुन आत्महत्येस प्रवृत्त करणे हा अतिगंभीर गुन्हा असून दोन पक्षकारांमधे स्वार्थापोटी कोर्टाबाहेर तडजोड होऊन खटला अथवा गुन्हा रद्द कदापी होऊ शकत नाही या आशयाच्या कोर्टाच्या निर्णयाने न्यायासाठी धडपडणाऱ्यांना नक्कीच आशेचा किरण दिसेल.

आपल्याकडे सर्वत्र जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात गाजावाजा करुन साजरा केला जातो. विशेष दिवस एकतर साजरे केले जातात किंवा पाळले जातात. आपल्या संस्थेत महिला दिन साजरा केला जात नाही आणि पाळलाही जात नाही. कारण आपण जेव्हा समानतेचा आणि समानसंधीचा आग्रह धरतो तेव्हा विशेष सवलती मागायच्या नसतात.

आज महिला दिन समारंभपुर्वक साजरा करावा अशी परिस्थिती अजिबात नाही. अशा काही भयानक, विकृत आणि चीड निर्माण करणाऱ्या घटना घडत आहेत.

स्त्री भ्रूण हत्येच्या गंभीर गुन्ह्याचा विषय लोकशाहीच्या मंदीरात म्हणजेच महाराष्ट्राच्या विधान भवनात 'स्थगन प्रस्तावाच्या' निकषात बसत नाही, म्हणून चर्चिलाही जात नाही. याला काय म्हणावे ?

एखाद्या महिलेवर सामुहिक बलात्कार करून तिला जिवंत जाळण्याच्या घटनेचे केवळ ती महिला मागासवर्गीय होती म्हणून निलाजरे राजकारण केले जाते. हे किती किळसवाणे आहे.

'तोंडी तलाक' घटनाबाह्य असूनही परदेशातून WhatsApp वर तलाक दिल्यावर सुनांना मुलांसह सासूनेच घराबाहेर हाकलून देण्याच्या कृत्याला माणुसकीला काळीमा फासणारे म्हणावे नाहीतर काय ?

आणि वरील तिन्ही घटना जर महिला दिनाच्या पुर्वसंध्येला घडत असतील तर महिला दिनाचा बेगडी समारंभ कशासाठी ? दोन वर्षात २४,७७१ हुंडाबळींची अधिकृत नोंद होत असेल, लहान बालिकांवर अत्याचार ही नित्याचीच बाब झाली असेल, तर महिला दिन समारंभपुर्वक साजरा करावा की दु:खद दिन म्हणून पाळावा हा यक्षप्रश्न अनुत्तरीतच राहणार आहे.

दोन वर्षांपूर्वी मुंबई उच्च न्यायालयाने शासनाची उदासिनता बघून उद्वीग्न होऊन राज्य शासनाला प्रश्न विचारला होता की ''हुंडा निर्मुलनासाठी शासनाने आजवर केले तरी काय ? उत्तरादाखल प्रतिज्ञापत्र सादर करावे.'' आजही हा प्रश्न अनुत्तरीतच आहे.

कोरोना विषाणूच्या संक्रमणामुळे झालेल्या लॉक डाऊन (पूर्ण बंदी) काळात कौटुंबिक हिंसाचाराच्या घटना वाढल्याचे निदर्शनास आले आहे. या काळात दारुची दुकानेही बंद होती. तसेच बाहेर जाण्यालाही बंदी असल्याने व्यसनी व्यक्ती अधिक हिंसक झाल्या असल्याची शक्यता दाट आहे. तसेच पुरुषप्रधान समाज असल्याने अनेक महिलांचे हिंसक शोषण झाल्याचेही निर्दशनास आले. एकूणच दारुचे व्यसन असलेल्या नवऱ्याचे मारहाणीचे प्रमाण व्यसन नसणाऱ्यांपेक्षा अधिक आहे आणि दारुचे व्यसन नसणाऱ्या पुरुषांचे प्रमाण कौंटुंबिक हिंसाचारात जरी त्या मानाने कमी असले तरी ते मात्र जुनाट व बुरसटलेल्या विचारांमुळे आपल्या पत्नीने कसे वागावे याची चौकट त्यांच्या पुरुषप्रधान विचारांनुसार मनात घट्ट पकडून असतात, त्यामुळे त्यांच्या धाकात न राहणाऱ्या पत्नीस ते लहान सहान कारणांवरून गंभीर स्वरूपाची दुखापत करणारी मारहाण करतात.

राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणाच्या निरीक्षणातून समोर आलेला अहवाल अतिशय धक्कादायक आहे. कौटुंबिक हिंसाचाराच्या कारणांमध्ये सासूला मान दिला नाही, हुंड्याची मागणी पूर्ण केली नाही, घरातल्या कामाकडे दुर्लक्ष झाले, वाद घातला, स्वत:ची मतं निर्भिडपणे मांडली. एकनिष्ठतेबद्दल शंका/ संशय घेतला किंवा आला. अशा कारणांपासून तर भाजीत मीठ मसाला कमी जास्त झाला व चहा आणायला काही मिनीटे विलंब झाला अशा अत्यंत क्षुल्लक कारणांचाही समावेश असतो. आश्चर्याची गोष्ट म्हणजे हिंसाचाराला बळी पडलेल्या ९४ टक्के महिलांना या हिंसाचाराचे फार वावगे वाटत नाही. सुशिक्षित आणि कमावत्या महिलांपेक्षा अशिक्षित, परावलंबी, अधिक मुलींना जन्म देणारी माता, तसेच विधवा व एकल महिलांना कौटुंबिक हिंसाचार सहन करावा लागतो. या सर्वेक्षणातील पिडीत महिलांच्या निवेदनानुसार कानाखाली मारणे, हात ओढणे, भिंतीवर ढकलून देणे, लैंगिक संबंध ठेवण्यास नकार दिल्यामुळे मारझोड करणे, वस्तू फेकून मारणे, तोंड दाबून ठेवणे, सिगारेटचे चटके देणे या प्रकारची हिंसा मुकाट्याने सहन करावी लागते. मात्र केवळ

३ टक्के पिडीत महिला तक्रार करून कायद्याचे संरक्षण घेतात. अशी विदारक स्थिती या सर्वेक्षणादरम्यान समोर आली आहे.

केवळ घरातच नाही तर घराबाहेरही महिला सुरक्षित नाहीत. मागील वर्षात मुंबईत बलात्कार आणि विनयभंगाच्या गुन्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली असून पिडीत महिलांमध्ये ६९ टक्के अल्पवयीन मुलींचा समावेश आहे हे धक्कादायक आहे. अत्याचार करणारे ९० टक्के पुरुष ओळखीचेच असतात आणि त्यातही आजोबा, वडील, काका, भाऊ यांचा समावेश बघून आपल्या भारतीय संस्कृतीचा ऱ्हास होत चालल्याचे जाणवते.

अशा प्रकारच्या गुन्ह्यांना अटकाव तर सोडाच परंतु पिडीत महिलेला न्याय मिळत नाही आणि तरी समाज, पोलीस आणि सरकार याबाबत आजही उदासीनच आहेत असे दिसते. पुरोगामी विचारांचे राज्य म्हणवणाऱ्या महाराष्ट्रात दर दोन तासांनी एक बलात्काराचा गुन्हा नोंदवला जातो. इतकेच नव्हे तर एकतर्फी प्रेमाच्या प्रकरणांतून झालेल्या हत्यांच्या घटनाही वाढत आहेत. एकतर्फी प्रेमातून अलीकडेच वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट येथे एका तरुणीला जाळलं गेलं. जिद्दीने शिक्षण पूर्ण करून ही तरुण मुलगी नुकतीच कॉलेजमध्ये प्राध्यापिका म्हणून रुजू झाली होती. तिच्यावर एकतर्फी प्रेम करणाऱ्या प्रेमवीराने ती सकारात्मक प्रतिसाद देत नाही म्हटल्यावर तिच्या अंगावर पेट्रोल टाकून तिला जाळण्याचा प्रयत्न केला. तिला वाचवण्याचे सर्वतोपरी प्रयत्न केले गेले. परंतु ती निरपराध मुलगी मृत्युशी झुंज देत अखेर मरण पावली. काय अपराध होता तिचा ? नकार देण्याचा हक्क मुलींनासुद्धा आहे. परंतु अहंकारी आणि माथेफीरु पुरुष हे मान्य करायलाच तयार नसतात. कारण कुटुंबात आणि समाजात त्यांच्यावर तसे संस्कारच होत नाहीत. यासाठी तरुण मुलांना आई वडीलांनी, कुटुंबियांनी नकार पचवण्याची ताकद द्यायला हवी. महिलांचा आदर करायला लहान वयातच शिकवायला हवे.

सर्वांचा असा समज असतो की सुशिक्षितांमध्ये आणि मोठमोठ्या शहरात जेथे महिला घराबाहेर पडून पुरुषांच्या बरोबरीने अर्थार्जन करतात तेथे हुंडाबळींचे प्रमाण कमी असेल अथवा अशा घटना होतच नसतील. परंतु हा समज चुकीचा ठरवणारे अहवाल प्रसिद्धी माध्यमांमधून प्रकाशित झाले आहेत, होत आहेत. हिंसाचाराची, छळाची कारणेही हुंडा प्रतिबंधक कायदा निष्प्रभ ठरवणारी आहेत. लग्नात मानपान झाला नाही, हुंडा कमी दिला, गाडी घेण्यासाठी माहेराहून पैसे आणले नाहीत, चारित्र्यावर संशय अशा असंख्य कारणांवरुन विवाहीतेचा मानसिक, शारीरिक छळ, मुंबई शहरात होत असल्याची अधिकृत नोंद आहे. २०१९ मधे प्रसिद्ध झालेल्या एका वृत्तानुसार मुंबई शहरात दिवसाला दोन विवाहीता हुंडा प्रथेच्या शिकार होत आहेत. माहितीच्या अधिकाराअंतर्गत मागवलेल्या माहितीनुसार महाराष्ट्रात वर्ष २०१६, २०१७ आणि २०१८ दरम्यान अनुक्रमे २४८,२३४ आणि २१४ हुंडाबळींची नोंद झाली हे आकडे अधिकृत असून हुंडाबळीच्या व्याख्येत कायदेशीरित्या बसणारी ही प्रकरणे आहेत. हुंडा प्रतिबंधक कायदा १९६१ साली लागू झाला. परंतू या कडक कायद्याचा हवा तसा प्रचार प्रसार समाजात न झाल्याने वरील तीन वर्षात अनुक्रमे केवळ ३८,३३ आणि ३४ हुंड्याची प्रकरणे दाखल झाली आहेत असे शासनाचे म्हणणे आहे.

## हुंड्याची व्याख्या

लग्न ठरत असतांना लग्नाची पूर्व अट म्हणून वरपक्षाने सोन्या चांदीचे दागदागिने, भांडी-कुंडी, रोख रक्कम, मानपान, पोशाख, व्याही भोजने, स्वागत समारंभ, प्रवासखर्च इ. प्रकारचे सर्व खर्च जे वधूपिता करतो म्हणजे ''हुंडा''.

कायद्यामधे केलेली हुंड्याची व्याख्या सोप्या शब्दात लग्नाच्या संबंधात कोणत्याही प्रकारची देवाण घेवाण करणे म्हणजे ''हुंडा''. कारण हा केवळ वधुपक्षाच्या इच्छेचा प्रश्न नसून वरपक्षाच्या अवाजवी अपेक्षांचा प्रश्न आहे. आणि या अपेक्षा वधुपक्षाने पूर्ण कराव्या असे म्हणणारा वरपक्ष एक प्रकारे वधूपक्षाला धर्मसंकटातच टाकत असतो. मग वधूपित्याची ऐपत असो वा नसो, या परिस्थितीत वधूपिता स्वत:ची ऐपत आणि वरपक्षाच्या अपेक्षा यांचा मेळ घालता घालता मेटाकूटीस येतो.

## हुंडा : वसुलीचे दुष्टचक्र

लग्नसमारंभात हुंडा देणे घेणे प्रतिष्ठेचे मानून समाजामध्ये आपली प्रतिष्ठा वाढावी म्हणून मुलीच्या लग्नात ''हुंडा'' दिला जातो तसेच मुलाच्या लग्नात दामदुपटीने वसूल केला जातो. असे वसुलीचे दुष्टचक्र अव्याहतपणे चालूच आहे. या प्रथेमुळे कित्येक संसार मोडले, कित्येक कुटुंबे उध्वस्त झाली. अनेक अगणित स्त्रीयांच्या जीवनाची राखरांगोळी झाली. परंतु तरीही पैशाची ही हाव काही कमी होत नाही. अव्दैतावर आधारीत भारतीय संस्कृतिला काळीमा फासणारी ही हुंड्याची प्रथा मोडून काढण्यासाठी व्यापक प्रमाणात जनजागृति करण्याची नितांत आवश्यकता आहे. सद्यस्थितीत कायद्याचा प्रचार, प्रसार आणि कठोर अंमलबजावणी यावर लक्ष केंद्रीत करायची नितांत गरज आहे. तरच समानतेचे स्वप्न पूरे होऊ शकते. यासाठी हुंडा प्रतिबंधक कायदा १९६१, कौटुंबिक हिंसाचार कायदा २००५ आणि कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक शोषण रोखण्यासाठीचा २०१३ मध्ये झालेला कायदा या तीनही कायद्यांवर जाणिव जागृतिचे कार्यक्रम महाविद्यालयांतून चळवळीतर्फे आयोजित करण्यात येतात.

## जनजागृतीसाठी महाराष्ट्र आणि इतर प्रांतात प्रचार दौरे

हुंडा रूढीशी निगडित जाती - प्रथा, रुढीप्रियता, अवाजवी समारंभ प्रियता, स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन, स्त्रीशिक्षण, स्त्रीचे आर्थिक स्वातंत्र्य व स्वावलंबन, स्त्री-पुरुष समानता, स्त्रियांना समान संधी इत्यादी प्रश्नांवर जनजागरण करून महाराष्ट्र व इतर प्रांतात चळवळीचा संदेश पोहोचविण्यासाठी प्रचार दौरे आयोजित केले जातात. सुरवातीपासून चळवळीसाठी तन-मन-धनाने वाहून घेणारे संस्थेचे संस्थापक कै. दा. ब. तथा मामासाहेब कुलकर्णी ही फार मोठी प्रेरक शक्ती चळवळीच्या पाठीशी वर्ष २०११ पर्यंत होती. पूज्य साने गुरुजींचा प्रदीर्घ सहवास लाभलेले आणि स्वातंत्र्य लढ्यात सक्रिय सहभाग असलेले मामासाहेब हे एक अत्यंत प्रभावी वक्ते होते. त्यांनी विद्यापीठे, महाविद्यालये, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम, सामाजिक आणि युवा संस्था, तसेच महिला मंडळांतून ५००० हून अधिक प्रबोधनपर व्याख्याने देऊन १० लाखांहून अधिक युवा नागरिकांना संबोधित केले. संस्थेच्या भूतपूर्व अध्यक्षा प्रा. शैलजा सांगळे यांनी जून २०२३ पर्यंत महिला सक्षमीकरण, आत्म सुरक्षा, मनोबल वृद्धी या विषयांवर महाराष्ट्रात विविध ठिकाणी व्याख्याने दिली, आणि कार्यशाळांमध्ये मार्गदर्शन केले. कै. मामासाहेबांची कन्या व चळवळीची महासचिव आशा कुलकर्णी हिने मामासाहेबांचे हे व्रत त्यांच्या निधनानंतर खंडित होऊ न देता पुढे चालू ठेवले असून मामासाहेबांच्या विचारांचा अनमोल वारसा आणि समाजक्रांतीची ही ज्योत समर्थपणे पुढे नेत आहे. या उपक्रमा अंतर्गत आजवर आशा कुलकर्णी यांनी ९०० हून अधिक व्याख्यानांचा टप्पा पार केला आहे. त्यात महाराष्ट्रातील अनेक विद्यापीठे तसेच महाविद्यालयांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग, महिला विकास विभाग तसेच निरंतर व प्रौढ शिक्षण विभागाचे विशेष सहकार्य लाभले आहे.

कोविड महामारीच्या काळात ऑन लाईन कार्यक्रम यशस्वी करण्यात आले. अहवालाचे वर्षी २५ कार्यक्रमांतून मार्गदर्शन केले त्याचा तपशील अहवालात इंग्रजी भागात दिला आहे.

चळवळीच्या खजिनदार डॉ. रश्मीताई फडणवीस एक निष्णात स्त्री रोग तज्ज्ञ असून त्याही महिलांच्या वैयक्तिक आरोग्याविषयी विविध माध्यमांतून मोलाचे मार्गदर्शन करतात. महिलांचे आरोग्य ठीक राहिले तरच त्यांचे सक्षमीकरण यशस्वी होईल. त्यामुळे महिलांचे शारीरिक आणि मानसिक आरोग्य महत्वाचे. यासाठी परीसंवाद, चर्चासत्रे, कार्यशाळा इ. माध्यमातून दिलेले त्यांचे योगदान मोलाचे आहे.

## पोस्टर प्रदर्शनातून समाज प्रबोधन

चळवळीच्या महासचिव आशा कुलकर्णी यांनी अतिशय परिश्रमपूर्वक निर्माण केलेले व जतन केलेले हुंड्याचे तसेच स्त्री भ्रूणहत्येचे दुष्परिणाम दाखवणारे भित्ती चित्र प्रदर्शन तसेच व्यंगचित्रांचे प्रदर्शन अत्यंत आकर्षक व प्रभावशाली असून ते देशातील सर्व प्रांतातून दाखवण्याची योजना असून आतापर्यंत महाराष्ट्र, गोवा, गुजरात, राजस्थान, दिल्ली, मध्यप्रदेश व कर्नाटक या प्रांतांतून ठिकठिकाणी दाखवले गेले आहे. एकूण १०० हून अधिक कार्यक्रमांतून हे प्रदर्शन लाखो लोकांनी पाहिले. या उपक्रमांबद्दल जाणकारांनी आणि मान्यवरांनी उत्तम अभिप्राय नोंदवले आहेत. पहिली राज्यस्तरीय भित्तीचित्र स्पर्धा १९७७ च्या मे महिन्यात घेण्यात आली त्या स्पर्धेचे पारितोषिक वितरण आणि प्रदर्शनाचे उद्घाटन मुंबईचे तत्कालीन महापौर श्री. मनोहर जोशी यांचे हस्ते झाले होते. पुढे २५ सप्टेंबर १९८३ रोजी चळवळीच्या दशवार्षिक अहवाल प्रकाशन प्रसंगी दुसऱ्या राष्ट्रीय स्तरावर आयोजित स्पर्धेचे पारितोषिक वितरण आणि प्रदर्शनाचे उदघाटन महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन महासंचालक - माहिती आणि जनसंपर्क विभाग, श्री. मोहनराव पाटील यांचे शुभहस्ते करण्यात आले होते. या दोन्ही स्पर्धांचे परीक्षण कॅम्लिन प्रा. लिमिटेड च्या उपाध्यक्षा श्रीमती रजनीताई दांडेकर यांनी केले तसेच स्पर्धेसाठी व प्रदर्शनासाठी आर्थिक सहाय्य केले. या भव्य प्रदर्शनाचे उद्घाटन नवशक्ती दैनिकाचे तत्कालीन संपादक श्री. पु. रा. बेहेरे यांचे हस्ते झाले. २०१३ साली हुंडाविरोधी सप्ताहादरम्यान तसेच कै. मामासाहेब कुलकर्णी यांच्या जन्मशताब्दी वर्षा निमित्ताने महाराष्ट्रातील चित्रकला महाविद्यालयातील कलाकार विद्यार्थ्यांनी चितारलेल्या भित्तिचित्रांचे नवीन प्रदर्शन निर्माण केले असून ''हुंडा आणि स्त्रीभ्रूणहत्या'' या दोन विषयांवर १२६ उत्कृष्ट कलाकृतींची भर यात पडली आहे. या प्रभावी माध्यमातून समाज प्रबोधन साधले जात आहे. या नवीन प्रदर्शनाचे उद्घाटन मुंबईचे तत्कालीन मा. महापौर श्री. सुनील प्रभू यांचे शुभहस्ते ५ डिसेंबर २०१२ रोजी झाले होते.



जिच्या कुशीत आपण जन्म घेतो ती आपली जन्मदात्री आई आणि जिच्या कुशीत आपण वाढतो ती आपली मातृभाषा व मातृभूमि या तीनही आपल्यासाठी अत्यावश्यक आहेत. आपले अस्तित्व तोलून धरणाऱ्या या माता आहेत.

**- गुरुदेव रविन्द्रनाथ टागोर**

## हुंडाविरोधी चळवळीचे नाविन्यपूर्ण भेटकार्ड

संस्थेने कोणत्याही शुभ प्रसंगी वापरता येईल असे नाविन्यपूर्ण भेटकार्ड तयार केले आहे. सदरहू कार्डावर नववधूवरांचा बाहुल्यांच्या रुपात बहुरंगी फोटो छापलेला असून आतील बाजूस महात्मा गांधींचा हुंड्याबाबत तरुणांना संदेश प्रसिद्ध केला आहे. संस्थेच्या महासचिव आशा कुलकर्णी यांनी कलात्मक रीतीने नववधूवरांच्या बाहुल्या तयार करुन या भेटकार्डाची निर्मीती केली आहे. संस्थेस अल्पशी देणगी देऊन ही भेटकार्डे सर्वांस उपलब्ध आहेत.

## समाजात विचार मंथनासाठी विविध विषयांवर स्पर्धा

(१) जाणीव जागृतीच्या विविध उपक्रमांबरोबरच विविध सामाजिक समस्यांवर समाजातील सर्व स्तरांवर विचार मंथन व्हावे या उद्देशाने १९७४ पासून चळवळीतर्फे साहित्य लेखन स्पर्धा आयोजित केल्या जात आहेत, याची आपल्याला कल्पना आहेच. मागील दहा वर्षात २०१४, १६ आणि २०१९ अशा तीन राज्यस्तरीय खुल्या लघुकथा लेखन स्पर्धा यशस्वी पार पडल्या. दर स्पर्धेत महाराष्ट्रातील १७ ते १८ जिल्ह्यांमधून सरासरी १२५ ते १३० लघुकथा सादर झाल्या. परीक्षण दिग्गज साहित्यिकांनी केले. त्यातील पहिल्या पाच पारितोषिक प्राप्त लघुकथा घेऊन एक कथा संग्रह प्रकाशित करण्याचे संस्थेने ठरवले. प्रेरणादायी साहित्य निर्मिती या उपक्रमा अंतर्गत "शलाका" हा लघुकथा संग्रह २९ मे २०२२ रोजी प्रकाशित झाला. या प्रकाशनाची पहिली आवृत्ती जवळजवळ संपत आली असून आतां दुसऱ्या आवृत्तीची तयारी करणार आहोत.

अहवालाचे वर्षी राज्यस्तरीय खुली निबंध स्पर्धा घेतली होती. एकूण तीन विषय देण्यात होते : (१) भारताला आज मंदिरांची गरज की विद्यापीठे आणि इस्पितळांची व कां ? (२) भारताच्या संविधानानुसार धर्मनिरपेक्ष लोकशाही म्हणजे काय ? (३) पर्यावरण ऱ्हास थोपविण्यासाठी माझे योगदान .

**सर्वोत्कृष्ट निबंधाला जगन्नाथ परळकर ट्रॉफी : प्रदीप व्यंकटेश पंडित, अंधेरी, मुंबई.**

| | | |
|---|---|---|
| विषय क्रमांक (१) प्रथम पारितोषिक | प्रदीप व्यंकटेश पंडित, अंधेरी, मुंबई. | रोख रु.२५००/- व प्रशस्तीपत्र |
| द्वितीय क्रमांक विभागून : | सुनेत्रा टिल्लू ,गोरेगाव आणि श्यामला भट, विलेपार्ले | रोख रु.७५०/- प्रत्येकी व प्रशस्तीपत्र |
| तृतीय क्रमांक विभागून : | अनुजा नाळे फलटण, सातारा व वैशाली जोशी, विलेपार्ले | रोख रु.५००/- प्रत्येकी व प्रशस्तीपत्र |
| पुढील तीन क्रमांकांना प्रशस्तीपत्र : | (१) दिगंबर रं. गिरीबुवा, करवीर, कोल्हापूर | प्रशस्तीपत्र |
| | (२) वीणा विकास बाविस्कर, जळगाव | प्रशस्तीपत्र |
| | (३) ज्योती सागर पाटील, शिरोळ, कोल्हापूर | प्रशस्तीपत्र |

| | | |
|---|---|---|
| विषय क्रमांक (२) प्रथम पारितोषिक | रितिक अनिल बलवीर, समुद्रपूर, वर्धा. | रोख रु.२५००/- व प्रशस्तीपत्र |
| द्वितीय पारितोषिक | प्राची सुनील गिरडकर, उमरेड, नागपूर | रोख रु.१५००/- व प्रशस्तीपत्र |
| तृतीय पारितोषिक | विजयकुमार ज. पाटणकर, पुणे. | रोख रु.१०००/- व प्रशस्तीपत्र |
| पुढील तीन क्रमांकांना प्रशस्तीपत्र : | (१) डॉ. कृष्णकांत वि. नाबर, माहीम, मुंबई. | प्रशस्तीपत्र |
| | (२) दीक्षा दीपक बिराजे, कोल्हापूर. | प्रशस्तीपत्र |
| | (३) दिव्या मल्लप्पा हेडडूरे, कोल्हापूर. | प्रशस्तीपत्र |
| विषय क्रमांक (३) प्रथम पारितोषिक | अनघा अनिल ठोंबरे, पुणे | रोख रु.२५००/- व प्रशस्तीपत्र |
| द्वितीय पारितोषिक | सीमा सुधाकर देवस्थळी अंधेरी, मुंबई | रोख रु.१५००/- व प्रशस्तीपत्र |
| तृतीय क्रमांक विभागून | (१) शुभांगी कृष्णकांत नाबर, माहीम | रोख रु.५००/- व प्रशस्तीपत्र |
| | (२) श्रद्धा वझे, कल्याण. (पश्चिम) | रोख रु.५००/- व प्रशस्तीपत्र |
| पुढील चार क्रमांकांना प्रशस्तीपत्र : | (१) संपदा राजेश देशपांडे, पनवेल, रायगड. | प्रशस्तीपत्र |
| | (२) मनोहर वि. जोगळेकर, बोरीवली, मुंबई. | प्रशस्तीपत्र |
| | (३) बकुल श्रीकांत बोरकर, विलेपार्ले, मुंबई. | प्रशस्तीपत्र |
| | (४) अनिल काशिनाथ ठोंबरे, कोथरूड, पुणे. | प्रशस्तीपत्र |

वरील तीन विषयांतील निबंधांचे परीक्षण अनुक्रमे अलका परळकर, प्रा. गिरीजा गुप्ते आणि गिरीश राऊत यांनी केले. महाराष्ट्रातील १७ जिल्ह्यांतून एकूण ९५ निबंध दाखल झाले. पारितोषिकांचे वितरण रविवार दिनांक २८ मे २०२३ रोजी मुंबई येथे हुंडाविरोधी चळवळीच्या ५० व्या वर्धापन दिनानिमित्ताने एका विशेष समारंभात प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुल, शहाजी राजे मार्ग, विलेपार्ले (पू) मुंबई येथे सायंकाळी ५ वाजता. न्या. सत्यरंजन धर्माधिकारी यांचे शुभहस्ते दिली गेली .

(२) मागील ३५ वर्षांपासून राज्यातील विविध विद्यापीठांशी सलंग्न महाविद्यालयांसाठी वक्तृत्व, घोषवाक्य, पथनाट्य, वादविवाद स्पर्धांचे आयोजन केले जाते. या स्पर्धा दरवर्षी मुंबई (दोन्ही जिल्हे : शहर व उपनगर) नवीमुंबई, रायगड, ठाणे, पुणे, नागपूर, जळगाव, धुळे, नंदुरबार, कोल्हापूर, औरंगाबाद अशा विविध जिल्ह्यातून आयोजित केल्या जातात. महाराष्ट्रात पुणे येथील मराठवाडा मित्रमंडळ वाणिज्य महाविद्यालय हे एकमेव असे महाविद्यालय आहे जेथे गेली ३० वर्षे सातत्याने हा उपक्रम राबवला जात आहे.

मागील ३५ वर्षात अनेक प्रभावी वक्ते या स्पर्धांमधून तयार झाले आहेत. याच उपक्रमा अंतर्गत युवा दिनाच्या निमित्ताने स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीच्या दिवशी १२ जानेवारीला राज्यस्तरीय आंतर विद्यापीठ वक्तृत्व स्पर्धाचे आयोजन १९७९ ते २०१८ असे ३० वर्षे केले गेले. परंतु शेवटची ४ ते ५ वर्षे प्रतिसाद अतिशय अत्यल्प असल्याने ३० वर्षांनंतर नाईलाजाने हा उपक्रम आंतर विद्यापीठ स्पर्धेऐवजी राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेत परावर्तीत करण्यात आला. परंतु कोविड - १९ महामारीमुळे दोन वर्ष लॉकडाऊन लागला आणि वक्तृत्व स्पर्धा होऊ शकल्या नाहीत. त्यामुळे नोव्हेंबर २०२० मध्ये ऑन लाईन राज्यस्तरीय घोषवाक्य स्पर्धा (१) हुंडा प्रथेचे दुष्परिणाम आणि (२) स्त्री भ्रूण हत्येचे दुष्परिणाम या दोन विषयांवर गुगल क्लास रूमच्या माध्यमातून आयोजित करण्यात आल्या. या स्पर्धेत महाराष्ट्रातील २२ महाविद्यालयांतून ३५ विद्यार्थ्यांनी १४९ घोषवाक्ये स्पर्धेसाठी दाखल केली होती. वर्ष २०२२-२३ पासून पुन्हा वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करण्यात येत आहे. २०२३-२४ या अहवालाचे वर्षी वरिष्ठ महाविद्यालयांसाठी राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा मानवाधिकार दिनानिमित्ताने १० डिसेंबर २०२३ रोजी आणि मुंबई शहर व उपनगरातील कनिष्ठ महाविद्यालयांसाठी हुंडाविरोधी सप्ताहात वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. कांदिवली एज्युकेशन सोसायटीच्या कनिष्ठ महाविद्यालयाला प्रथम पारितोषिकासह अक्का ओक ट्रॉफी प्रदान करण्यात आली तसेच अकोला येथील कृषी महाविद्यालयाला प्रथम पारितोषिकासह राजेंद्र शिल्ड, लक्ष्मीदेवी भीष्म आर्य ट्रॉफी तसेच रोख पारितोषिक देण्यात आले, पारितोषिक स्वीकारायला अकोल्याहून प्रा. डॉ. प्रकाश नागरे सहयोगी अधिष्ठाता आणि विभाग प्रमुख प्रा. डॉ. गिरीष हे दोघेही जातीने उपस्थित होते. प्रथम पारितोषिक विजेते कनिष्ठ महाविद्यालय आणि कृषी महाविद्यालयातील अनुक्रमे जिनय विपुल गाडा आणि वैभव विठ्ठल ताजणे यांचे अभिनंदन!

(३) १९८५ या वर्षापासून महाराष्ट्रातील सर्व वरिष्ठ महाविद्यालयांसाठी राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन निबंध लेखन स्पर्धा विविध सामाजिक विषयांवर आयोजित केल्या जात. दरवर्षी महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठातून सरासरी ३०० ते ३५० विद्यार्थी भाग घेत. परंतु लिखाणाचा दर्जा दिवसें-दिवस खूपच खालावलेला दिसून आला. त्यामुळे निबंध लेखन स्पर्धांना विराम द्यावा लागला. परंतु कोविड - १९ महामारीमुळे दोन वर्ष लॉकडाऊन लागला आणि म्हणून राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन निबंध लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ऑनलाईन शिक्षणामुळे मुलांच्या लेखन क्षमतेवर, विचार शक्तीवर, आकलन क्षमतेवर झालेला परिणाम पाहून पालक आणि शिक्षकांची चिंता वाढली आहे, तसेच भाषा विषयात विद्यार्थी मागे पडत असल्याचे निरीक्षण नोंदवण्यात आलेले असताना या निबंध स्पर्धेला मिळालेल्या अभूतपूर्व प्रतिसादाला बघून वेगळाच निष्कर्ष निघत आहे. विशेष बाब ही की गेल्या ३४ वर्षांपासूनच्या या उपक्रमात लॉकडाऊनमुळे खंड पडला नाही. वर्ष २०२१-२२ चे निबंधाचे विषय होते. (१) कोविड -१९ महामारीने काय शिकवले? (२) सोशल मीडिया शाप की वरदान (३) २१ व्या शतकात धर्माचे स्थान. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून

मराठी, हिंदी आणि इंग्रजी या तिन्ही भाषांमध्ये २२८ महाविद्यालयांतून ८४३ निबंध स्पर्धेत दाखल झाले. पहिल्या विषयावर ९२ महाविद्यालयांतून ४०४ निबंध, दुसऱ्या विषयावर ८७ महाविद्यालयांतून ३३९ आणि तिसऱ्या विषयावर ४९ महाविद्यालयांतून १०० असे एकूण ८४३ निबंध असा उत्स्फूर्त प्रतिसाद हेच दर्शवतो की युवा पिढीची लेखन क्षमता अबाधित असून युवकांची सकारात्मक विचार शक्ती समाजाला आणि पर्यायाने देशाला उज्वल भविष्य देण्यासाठी सक्षम आहे. मागील ३५ वर्षांपासून आंतर महाविद्यालयीन लघुकथा लेखन, पथनाट्य तसेच लघुपट स्पर्धा आयोजित केल्या जात आहेत. अहवालाचे वर्षी आंतर महाविद्यालयीन निबंध लेखन स्पर्धा आयोजित केल्या नाहीत.

## तक्रार निवारण केंद्र

स्त्रियांना त्यांच्या दैनंदिन जीवनात येणाऱ्या अडचणी, त्यांच्यावर होणारे अन्याय /अत्याचार, कौटुंबिक हिंसा, हुंड्यासाठी छळ, हुंडाबळी व आत्महत्येची प्रकरणे यात चळवळ सातत्याने सुरुवाती पासूनच पीडित स्त्रियांना मार्गदर्शन करीत आहे. तक्रारी संबंधितांकडे कारवाईसाठी पाठवल्या जातात तसेच त्याचा पाठपुरावा केला जातो.

यात जिल्हा विधी सेवा प्राधिकरण तसेच जिल्हा महिला व बालविकास अधिकारी व संरक्षण अधिकारी, हुंडाविरोधी अधिकारी यांची मदत मोलाची ठरते. चळवळीतर्फे पीडित महिलांसाठी एक हेल्पलाईन सुद्धा चालविली जाते. रोज सायंकाळी ५ ते ७ या वेळेत महिला ०२२-२६८३६८३४ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधू शकतात. तसेच महासचिव आशा कुलकर्णी यांचा भ्रमणध्वनी सुद्धा या मदतीसाठी तत्पर असतो. ९८१९३७३५२२ अथवा ९८१९५३९१९३.

## भावी शिक्षकांसाठी विशेष उपक्रम

भावी पिढी संवेदनशील व अभ्यासू व्हावी या उद्देशाने चळवळ अनेक शैक्षणिक उपक्रम राबवत आहे. मागील १५ वर्षांपासून बी. एड.च्या विद्यार्थ्यांसाठी आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व, निबंध, वादविवाद, पथनाट्य इ. स्पर्धांचे आयोजन केले जाते. यातून भावी शिक्षकांना विविध विषयांचा अभ्यास करण्याची संधी मिळते. या उपक्रमात शासकीय शिक्षण शास्त्र महाविद्यालय, मुंबई तसेच गांधी शिक्षण भवनचे सुरजबा कॉलेज ऑफ एज्युकेशन या दोन महाविद्यालयांनी सहकार्य केले. परंतु लॉक डाउन नंतर या उपक्रमात खंड पडला आहे.

## पुणे आणि जळगाव जिल्ह्यातील उपक्रम

पुण्याच्या मराठवाडा मित्र मंडळाच्या वाणिज्य महाविद्यालयाने मागील ३० वर्षांपासून पुणे आणि परिसरातील सर्व शाखांच्या वरिष्ठ महाविद्यालयांसाठी वक्तृत्व स्पर्धा आयोजित करायला मोलाचे सहकार्य केले, तसेच जळगांवच्या मुळजी जेठा महाविद्यालयाने सुद्धा उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्न सर्व वरिष्ठ महाविद्यालयांसाठी वक्तृत्व स्पर्धा तसेच पथनाट्य स्पर्धा आयोजित करायला मोलाचे सहकार्य केले, परंतु लॉक डाउन नंतर या उपक्रमात खंड पडला आहे.

## हुंडाविरोधी दिवस आणि सप्ताह

हुंडा प्रथा ही स्त्री पुरुष समानतेच्या तत्वांशी विसंगत प्रथा आहे. भारताच्या राज्यघटनेत ''स्त्री-पुरुष समानता, सर्वांना समान न्याय आणि सर्वांना समान संधी'' ही मूलतत्वे मान्य करून स्वीकारण्यात आली आहेत. भारताला स्वातंत्र्य

मिळाल्यानंतर १९४९ साली २६ नोव्हेंबर रोजी आपली पवित्र राज्यघटना तयार झाली आणि जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीने या राज्यघटनेचा स्विकार केला. परंतु ही मूलतत्वे केवळ घटनेच्या पुस्तकातच राहिली आहेत, या तत्वांचा प्रत्यक्ष जीवनात अंमल झालाच नाही. या पार्श्वभूमीवर चळवळीने २६ नोव्हेंबर हा ''हुंडाविरोधी दिवस'' पाळण्याचे ठरवले. संस्थेचे संस्थापक मामासाहेब कुलकर्णी यांनी शासनाला निवेदन दिले की शासकीय पातळीवर हा दिवस पाळण्यात यावा. या निवेदनाचा त्यांनी सहा ते आठ वर्षे पाठ पुरावाही केला. आणि विशेष बाब म्हणजे हुंडा प्रथेचे गंभीर असे दुष्परिणाम बघून चळवळीच्या या विनंतीला मान देऊन महाराष्ट्र शासनाने सुद्धा राज्यपालांच्या स्वाक्षरीने विशेष परिपत्रक जारी करून राज्यातील सर्व जिल्ह्यात शासकीय पातळीवर २६ नोव्हेंबर हा हुंडाविरोधी दिवस व पुढील सप्ताह पाळण्यात यावा असे आदेश दिले. चळवळीच्या कार्याला मिळालेला हा महाराष्ट्र सरकारचा बहुमोल पाठिंबाच म्हणावा लागेल. दरवर्षी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची रॅली आयोजित केली जाते. २६ नोव्हेंबर २०१८ रोजी महाराष्ट्र पोलीसांच्या अतिरिक्त महासंचालक डॉ. प्रज्ञा सरवदे (आय. पी. एस.) यांनी तर २०१९ साली मुंबई उपनगराचे जिल्हाधिकारी श्री. बोरकर (आय. ए. एस.) यांनी रॅलीला संबोधित केले. या सप्ताहा दरम्यान अनेक उपक्रम राबविले जातात. अहवालाच्या वर्षी (२०२३-२४) हुंडाविरोधी रॅलीला अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. मुंबईच्या उपनगरातील एकूण ३६ महाविद्यालयांचे राष्ट्रीय सेवा योजना आणि एन. सी. सी. चे ५०० विद्यार्थी – विद्यार्थिनी आणि शिक्षक सहभागी झाले. साठ्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. माधव राजवाडे यांनी पदयात्रेचे स्वागत केले आणि उपस्थित सहभागींना हुंडाविरोधी शपथ दिली तसेच विलेपार्ले पूर्व पोलीस स्टेशनच्या वरिष्ठ निरीक्षक श्रीमती रेणुका बुवा यांनी उपस्थित सहभागी विद्यार्थ्यांना संबोधित केले. २६ नोव्हेंबर हा दिवस "संविधान'' दिवस असल्याने चळवळीतर्फे संविधानाची मराठी प्रत प्राचार्यांच्या हस्ते विलेपार्ले पूर्व पोलीस स्टेशनला भेट देण्यात आली. हुंडाविरोधी सप्ताहात वरिष्ठ महाविद्यालयांसाठी राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा आणि मुंबई शहर आणि उपनगरातील कनिष्ठ महाविद्यालयांसाठी वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन केले होते. सप्ताहाचा तपशील, पारितोषिक वितरणाचे फोटो आणि स्पर्धांचा निकाल अहवालाच्या इंग्रजी भागात देण्यात आला आहे.

## ''समाज प्रगतीस माझे सहाय्य'' या विषयावर निवेदनमाला

राष्ट्रोन्नतीसाठी, समाज प्रगतीसाठी विविध प्रकारे सहाय्य करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांचा आणि संस्थांचा प्रत्यक्ष परिचय घडवून नागरिकांस समाज क्रांतीमध्ये सहभागी करून घेण्याच्या दृष्टीने चळवळीने १९८२ सालापासून ''समाज प्रगतीस माझे सहाय्य'' या विषयावर निवेदन मालिका सुरु केली. या अभिनव योजनेस उत्स्फूर्त असा प्रतिसाद आम जनतेकडून मिळाला. गेल्या पंधरा वर्षात या उपक्रमात विविध क्षेत्रांतील सामाजिक कार्यकर्त्यांनी आणि संस्थांच्या कार्याची ओळख झाली. या निवेदनमालेचे पहिले पुष्प गुंफले हिंगणे महिलाश्रमाच्या श्रीमती शांताबाई परांजपे यांनी. शांताबाईंनी आयुष्यभर पायपीट करून आश्रमातील अनाथ महिलांच्या उन्नतीसाठी मदत म्हणून लाखो रुपयांची भाऊबीज सामान्य जनतेकडून मिळवली.

''समाज प्रगतीस माझे सहाय्य'' या व्याख्यानमालेत शांताबाई परांजपे यांच्या व्यतिरिक्त राजा राजवाडे - ज्येष्ठ साहित्यिक, लीलाधर हेगडे - सानेगुरुजी कथामाला, प्रकाशबुवा मुळे - रामदास भक्त, सुनंदा भट - आदर्श शिक्षिका व सामाजिक कार्यकर्त्या, कमलाताई बडवे - सामाजिक कार्यकर्त्या पंढरपूर, डॉ. पां. वि. चंद्रात्रे - मराठी विज्ञान परिषद मुंबई, अभया शहाणे - प्रकल्प अधिकारी, समाज कल्याण विभाग, अरविंद पटवर्धन - पोलीस उपायुक्त मुंबई, चंद्रशेखर

वाघ - पत्रकार, उपसंपादक लोकसत्ता मुंबई, आकाशानंद देशपांडे -दूरदर्शन निर्माता मुंबई या व अश्या अनेक दिग्गज व्यक्तींचा समावेश आहे. हा उपक्रम १९८२ सालापासून साधारणपणे १५ वर्षे राबवला. जनतेचा प्रतिसादही उत्तम होता, परंतु हळूहळू जसा काळ गेला तशी लोकांची अभिरुची बदलू लागली. श्रोत्यांची संख्या रोडावली. या कारणास्तव १९९९ नंतर हा उपक्रम थांबला. पुढे २००७ मध्ये संस्थापक सदस्या राधाबाई कुलकर्णी यांच्या निधनानंतर त्यांच्या स्मरणार्थ मामासाहेबांनी जिल्हास्तरीय विधायक कार्यकर्ती पुरस्कार देण्यास सुरुवात केली. त्यामुळे त्या निमित्ताने काही प्रमाणात समाज प्रगतीस सहाय्य करणाऱ्या विधायक कार्यकर्त्यांचे अनुभव ऐकण्याची संधी दर वर्षी मिळत आहे.

## हुंडाविरोधी चळवळीतर्फे गुणवंतांचा गौरव

**(१) विधायक कार्यकर्ती पुरस्कार :** चळवळीच्या संस्थापक सदस्या कै. सौ. राधाबाई कुलकर्णी यांचे स्मरणार्थ मागील चौदा वर्षांपासून सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या महिलेसाठी विधायक कार्यकर्ती पुरस्कार देण्यात येतो. स्वातंत्र्य लढ्याच्या काळात १९४२ ते १९४७ दरम्यान जेव्हा पूज्य साने गुरुजी ब्रिटिश सरकारच्या ससेमिऱ्यापासून वाचण्यासाठी भूमिगत झाले आणि वेशांतर करून वणवण करीत असत. तेव्हा त्यांना स्वतः स्वयंपाक करून पोटभर जेऊ घालून त्यांची काळजी घेण्याचे भाग्य लाभलेल्या कै. सौ. राधाबाई यांचे हुंडाविरोधी चळवळीच्या ४५ वर्षांच्या प्रदीर्घ वाटचालीत स्वतःचे राहते घर चळवळीच्या कार्यासाठी देण्यापासून तर पीडित महिलांचे सांत्वन करून प्रसंगी त्यांना चार घास भरवून धीर देण्यापर्यंत फार मोठे योगदान होते. त्यांच्या स्मरणार्थ दिला जाणारा हा पुरस्कार दरवर्षी एका जिल्ह्यासाठी जाहीर होतो. आजवर खालील चौदा जिल्ह्यातील विधायक कार्य करणाऱ्या चौदा झुंजार महिलांना सन्मानित केले आहे. ६ फेब्रुवारी २००७ रोजी राधाबाईंचे निधन झाले व हा पुरस्कार मे २००८ पासून देण्यात येत आहे. जळगाव, अहमदनगर, अकोला, अमरावती, औरंगाबाद, बीड, भंडारा-गोंदिया (संयुक्त), बुलडाणा, चंद्रपूर, धुळे, गडचिरोली, जालना, कोल्हापूर आणि लातूर या चौदा जिल्ह्यांच्या अनुक्रमे प्रा. शीला पाटील, डॉ. सुधा कांकरिया, ऍडव्होकेट संगीता भाकरे, श्रीमती नलिनी फुसे, डॉ. रश्मी बोरीकर, प्रा. सविता शेट्ये, डॉ. तेजस्विनी भुस्कुटे, डॉ. इंदुमती लहाने, डॉ. पारोमिता गोस्वामी, श्रीमती मीना भोसले, श्रीमती शुभदा देशमुख, ॲडव्होकेट कल्पना त्रिभुवन, श्रीमती राजश्री साकळे आणि ॲडव्होकेट सुजाता माने केंद्रे या पुरस्कार्थींना सन्मानित करण्यात आले आहे. पुरस्काराचे स्वरूप : मानधन रु.१०,०००/- सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह, खादी सुताचा हार, आणि साडी व श्रीफळ असे असून कुलकर्णी कुटुंबीयांनी या पुरस्काराचा संपूर्ण आर्थिक भार उचलला आहे.

**(२) सेवाव्रती डॉक्टर पुरस्कार :** मागील ७ वर्षांपासून म्हणजेच वर्ष २०१५-१६ पासून कै. शकुंतला परळकर यांच्या स्मरणार्थ सेवाव्रती डॉक्टर पुरस्कार देण्यात येतो. आतापर्यंत खालील सहा डॉक्टरांना सन्मानित करण्यात आले आहे. डॉ. सुरेखा धुरंधर - विलेपार्ले, डॉ. नीळकंठ श्रीकृष्ण फडके – कर्जत डॉ. अरुण पाटील – डोंबिवली , डॉ. विश्वास सापटनेकर - ठाणे, डॉ. भारती कोंडविलकर – बोरीवली, डॉ. आशीष देशपांडे – विलेपार्ले आणि डॉ रागिणी पारेख मुंबई. पुरस्काराचे स्वरूप मानधन रु.१०,०००/- ,सन्मानपत्र, सन्मानचिन्ह, खादी सुताचा हार, शाल आणि श्रीफळ असे असून आर्थिक भार संस्थेच्या खजिनदार आणि शकुंतला परळकर यांच्या कन्या डॉ. रश्मी फडणवीस यांनी उचलला आहे.

**(३) साने गुरुजी युवा पुरस्कार :** मामासाहेबांनी युवा पिढीच्या सर्वांगीण विकासाचा ध्यास घेतला होता .युवा पिढी म्हणजे देशाचे भविष्य! युवकांना अंधश्रद्धेपासून परावृत्त करण्यासाठी, त्यांच्या विचारांची दिशा विज्ञाननिष्ठीत व्हावी, आधुनिक युगात बलसागर भारत घडवण्याचे स्वप्न त्यांनी पहिले, यासाठी तरुणांनी सक्षम व्हावे म्हणून मामांनी आयुष्य वेचले. वयाच्या ९८व्या वर्षापर्यंत विविध विद्यापीठे आणि महाविद्यालयातून ते जाणीव जागृतीसाठी, युवकांशी संवाद साधण्यासाठी, व्याख्यानांसाठी जात होते. मृत्यूपूर्वी जवळजवळ ३० ते ३५ वर्षाच्या दीर्घ काळात त्यांनी ५ हजारांहून अधिक युवा सक्षमीकरणाचे कार्यक्रम यशस्वी केले. या कार्यासाठी त्यांनी भारतभर प्रवास केला, महाराष्ट्र तर अक्षरशः पिंजून काढला. मामा साने गुरुजींचे विद्यार्थी. गुरुजींचा प्रदीर्घ सहवास त्यांना लाभलेला आणि म्हणून हे सर्व शक्य झाले ते केवळ सानेगुरुजींच्या प्रेरणेने आणि आशीर्वादाने अशी मामासाहेबांची धारणा होती.

३ ऑक्टोबर २०११ रोजी त्यांना देवाज्ञा झाली. त्यानंतरचे वर्ष मामांच्या जन्मशताब्दीचे वर्ष होते. त्या निमित्ताने वर्ष २०१२-१३ पासून मामासाहेबांच्या स्मरणार्थ व साने गुरुजींच्या नावाने संस्था साने गुरुजी युवा पुरस्कार दरवर्षी युवा दिनाचे निमित्ताने दोन युवकांना देते. या पुरस्काराचे स्वरूप असते : मानधन रु.१०,०००/-, सन्मानपत्र, चांदीचे सन्मानचिन्ह, ग्रंथभेट, आणि खादीच्या सुताचा हार (मामांनी आजीवन खादी वापरली ते खरंच एकादशव्रताचे पालन करणारे गांधीवादी होते) या पुरस्काराचा संपूर्ण खर्च कुलकर्णी कुटुंबीयांतर्फे विशेषतः मामानी कुटुंबियांसाठी मागे ठेवलेल्या पुंजीतून केला जातो. मामा नेहमी म्हणत आपल्या स्वतःच्या मिळकतीतून कुटुंबाच्या चरितार्थासाठी लागणारा निधी वगळता उरलेला पैसा समाजाचा असतो आपण त्याचे केवळ विश्वस्त असतो.

**गेल्या अकरा वर्षात बावीस असे पुरस्कार दिले गेले आहेत.**

**वर्ष १ ले : (१) स्विटी प्रकाश पाटे – चाळीसगाव, जिल्हा जळगाव –** एरोस्पेस इंजिनीअर, नासा मध्ये एका वर्षात दोन प्रोजेक्ट्स सादर करणारी पहिली भारतीय युवा वैज्ञानिक युवती. (जानेवारी २०१३) आज स्विटी नासा मध्ये संशोधक (Reseaerch Scientist) या पदावर कार्यरत आहे.

**(२) धीरज राजेंद्र जाधव - पुणे – इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअर –** नासाच्या मंगळयानातील संदेश यंत्रणेसाठी मोलाचे संशोधन. (जानेवारी २०१३)

**(३) अलंकार शशिकांत कोतवाल - ठाणे –** जागतिक स्तरावर सायन्स ऑलिम्पियाड मध्ये सुवर्ण पदक मिळवून भारतीय चमूला यश देणारा युवा वैज्ञानिक. (जानेवारी २०१३)

**(४) जयश्री जानू खरपडे - वाडा, जिल्हा ठाणे –** प्रतिकूल परिस्थितीत संघर्षमय जीवनात स्वतःचे मनोधैर्य वाढवून इतरांना प्रेरणा देणारी आदिवासी युवती (जानेवारी २०१३)

**वर्ष २ रे : (५) सजल सुरेश कुलकर्णी - नागपूर –** बायोटेकनॉलॉजिस्ट युवा वैज्ञानिक (जानेवारी २०१४)

**(६) डॉ.प्रियदर्श तुरे : मेळघाट, अमरावती –** जीवाची पर्वा न करता दुर्गम भागात वैद्यकीय सेवा पुरवणारा एक युवा डॉक्टर. (जानेवारी २०१४)

**वर्ष ३ रे : (७) अजिंक्य हेमंत पाटील - नाशिक –** रेडिओ ऍस्ट्रॉनॉमि विषयात संशोधनासाठी नेदरलँड्स येथे १२ कोटीची शिष्यवृत्ती मिळवणारा एकमेव भारतीय युवा (जानेवारी २०१५)

**(८) अभिषेक निर्मल हुंबड - बंगलोर –** जागतिक स्तरावर तीस वर्षाखालील तीस प्रतिभावान व्यक्तींमधे एक स्थान मिळविणारा एकमेव भारतीय युवा अभियंता. (जानेवारी २०१५)

**वर्ष ४ थे : (९) सचिन बंडोपंत तळेकर - राधानगरी, कोल्हापूर –** प्रदूषणावर मात करण्यासाठी जैव तंत्रज्ञानात उल्लेखनीय संशोधन करणारा युवा वैज्ञानिक (जानेवारी २०१६)

**(१०) सायली मकरंद चुरी - माहीम, मुंबई –** विदेशी भाजा व फळे लागवडीच्या क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणारी कृषितद्न्य युवती (जानेवारी २०१६)

**वर्ष ५ वे : (११) विराज विनायक रानडे : नाशिक –** पर्यावरण रक्षणार्थ लोकोपयोगी संशोधन करणारा युवा वैज्ञानिक (जानेवारी २०१७)

**(१२) जान्हवी विलास लोकेगावकर : चेंबूर, मुंबई –** राष्ट्रीय सेवा योजना गटाचे, दिल्ली येथे प्रजासत्ताक दिनी राजपथावर संचालनाचे नेतृत्व करणारी युवती (जानेवारी २०१७)

**वर्ष ६ वे - : (१३) रुपाली रवींद्र माळी -** सोनगीर, धुळे. एका सामान्य गरीब शेतकरी कुटुंबातील रुपाली माळीने युवक कल्याण आणि महिला सक्षमीकरण या क्षेत्रात दिलेल्या उल्लेखनीय योगदानाबद्दल युवा पुरस्काराचा मान. (जानेवारी २०१८)

**(१४) प्रथमेश सोमा हिरवे -** पवई, मुंबई.अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून आलेल्या प्रथमेशने भारतीय अंतरिक्ष संशोधन अनुसंधान मधील संशोधनासाठी स्वत:ची गुणात्मक योग्यता अधोरेखित करत सोळा हजार अभियंता उमेदवारांतून पाचव्या क्रमांकाची निवड मिळविली. (जानेवारी २०१८)

**वर्ष ७ वे - : (१५) आदित्य दिनकरराव कुलकर्णी - परभणी :** तंत्रज्ञानाच्या योग्य वापराने आरोग्य क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय संशोधनाबद्दल आदित्यला जागतिक आरोग्य संघटनेने तसेच ब्रिटनच्या राणी एलिझाबेथने सन्मानित केले आहे असा युवा वैज्ञानिक. (जानेवारी २०१९)

**(१६) अमोल शिवाजी राठोड - परभणी, जिल्हा अहमदनगर :** अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत ग्रामीण भागातील अनाथ, निराधार बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी दिलेल्या रचनात्मक योगदानाबद्दल आदिवासी, बंजारा, कातकरी समुदायातील बालकांसाठी अनेक उपक्रम राबवल्याबद्दल साने गुरुजी युवा पुरस्कारने सन्मानित. (जानेवारी २०१९)

**वर्ष ८ वे : (१७) रोहिणी अनुराधा नरेंद्र जोशी - पुणे -** जागतिक पातळीवर महिला गणित ऑलिम्पियाड मध्ये भारताला प्रथमच रौप्य पदकाचा सन्मान मिळवून देऊन स्वत:ची गुणात्मक योग्यता अधोरेखित करणारी पहिले मराठी संशोधक युवती. रोहिणीला साने गुरुजी युवा वैज्ञानिक पुरस्काराने सन्मानित करण्या आले. (जानेवारी २०२०)

**(१८) तन्वीर तमन्ना अस्लम इनामदार - पुणे** - तंत्रज्ञानातील संशोधनाचे कौशल्य समाजोन्नतीसाठी वापरून केलेल्या समाजकार्यातील भरीव योगदानाबद्दल युवा वैज्ञानिक पुरस्कार देण्यात आला. तन्वीरला संयुक्त राष्ट्र द्वारा कर्मवीर चक्र आणि युवा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. मागील तीन वर्षात तन्वीरने पेटंटसाठी एकापेक्षा अधिक अर्ज दाखल केले आहेत. (जानेवारी २०२०)

**वर्ष ९ वे : (१९) डॉ. कोमल शामला कासा मडावी – सिरोंचा, जिल्हा गडचिरोली** – अतिशय प्रतिकूल परिस्थितीत मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर वैद्यकीय शिक्षण पूर्ण करून आदिवासी समाजाच्या माडिया जमातीतील पहिली महिला डॉक्टर बनण्याचा विक्रम प्रस्थापित केला आहे. (जानेवारी २०२३)

**(२०) संदीप सुधा सुभाष दहिसरकर** – प्राचीन भारतीय संस्कृती आणि पुरातत्व शास्त्रात उल्लेखनीय योगदान दिले. विविध शिल्पे शिल्पकार, प्राचीन मंदिरे, ऐतिहासिक स्मारके, महत्वाच्या स्थानांचा इतिहास, महान व्यक्ती आणि त्यांचे कार्य अश्या अनेक विषयांवर शोध निबंध प्रकाशित, तसेच अनेक कार्यशाळांचे आणि हेरीटेज पदयात्रांचे यशस्वी आयोजन. तरुण वयातच "दि पाठारे क्षत्रीय ऑफ बॉम्बे'' आणि "पारले ज्ञात-अज्ञात३ ही दोन पुस्तके प्रकाशित. (जानेवारी २०२३.)

**वर्ष १० वे : (२०२३-२४) (२१) लेफ्टनंट अपूर्वा गीते** - यांना मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर भारतीय नौसेनेत लेफ्टनंट पदावर पोचणारी महाराष्ट्रातील पहिली महिला नौसेना वैमानिक होण्याचे यश मिळवल्या बद्दल "सानेगुरुजी युवा पुरस्कार'' प्रदान करण्यात आला.

**(२२)श्वेता धनश्री श्रीनिवास बर्वे** यांना मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर स्वत:च्या संशोधनातून सुपारीच्या विऱ्यापासून चप्पल बनवून उत्पादनाचे पेटंट मिळवण्यात यश मिळवल्या बद्दल " सानेगुरुजी युवा वैज्ञानिक पुरस्कार " प्रदान करून गौरवण्यात आले. (जानेवारी २०२४)

**(४) साने गुरुजी आदर्श शिक्षक पुरस्कार :** २०१९ वर्षापासून साने गुरुजी आदर्श शिक्षक पुरस्कार देण्यास सुरुवात केली असून पहिला पुरस्कार सुप्रसिद्ध लेखक आणि अध्यापक श्री हेरंब कुलकर्णी – अहमदनगर यांना, दुसरा २०२२-२३ वर्षाचा अमरावतीच्या प्रश्नचिन्ह निवासी आश्रम शाळेचे संस्थापक आणि अध्यापक श्री. मतीन भोसले यांना, आणि तिसरा वर्ष २०२३-२४ वर्षाचा पुरस्कार उपक्रमशील शिक्षक श्री उमेश घेवरीकर यांना देण्यात आला. पुरस्काराचे स्वरूप : मानधन रु.१०,०००/-, सन्मानपत्र, सन्मानचिन्ह, ग्रंथभेट, आणि खादी सुताचा हार, असे असून या पुरस्काराचा आर्थिक भार संस्थेच्या महासचिव आशा कुलकर्णी यांनी उचलला आहे.

## सामाजिक विषयांवर परिसंवाद

विविध सामाजिक विषयांवर विचारमंथन व्हावे आणि विविध क्षेत्रातील प्रसिद्ध वक्त्यांचे विचार ऐकण्याचे जनसामान्यांना संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने संस्थेने १९८५ पासून खालील विषयांवर परिसंवाद आयोजित केले गेले. (१) स्त्री मुक्ती (२) खरा तो एकची धर्म (३) आंतरजातीय विवाह यशापयश (४) माणसा माणसा कधी होशील माणूस... (५) ज्ञाती संस्था गुणदोष (६) आजचे सामाजिक जीवन. (७) सामाजिक क्रांतीविषयी माझ्या कल्पना.

(८) विविध धर्मातील विवाह पद्धती. (९) नरेचि केला हीन किती नर. (१०) स्त्री मुक्ती आणि हुंडाबंदी. (११) स्त्री मुक्ती एकच पर्याय. (१२) बदलत्या मनोभूमिका तिच्या, त्याच्या, व आपल्या. (१३) हुंडा प्रतिबंध कायदा व अंमलबजावणी. (१४) हुंडा प्रतिबंध कायद्याची ६० वर्षे आणि वर्तमान स्थिती. प्रसार माध्यमांचे सहकार्य.

## प्रसार माध्यमांचे सहकार्य

चळवळीच्या जाणीव जागृतीच्या विविध उपक्रमांना योग्य वेळी योग्य रीतीने प्रसिद्ध देण्याची नितांत गरज असते. प्रसार माध्यमांचा मागील ५० वर्षांचा अनुभव संमिश्र आहे. चळवळीच्या उपक्रमांना प्रसार माध्यमांनी अत्यल्प प्रसिद्धी दिली. अपवाद होते फक्त दोन, ज्यांनी भरपूर ऑन लाईन प्रसिद्धी दिली. त्यात महत्वाचा उल्लेख ''न्यूज स्टोरी टूडे'' या वेब पोर्टलचा करायला हवा. ''न्यूज स्टोरी टूडे'' चे संपादक निवृत्त संचालक माहिती आणि प्रसारण विभाग श्री देवेंद्र भुजबळ यांनी आपल्या सर्व उपक्रमांना अतिशय उत्तम आणि मोठी प्रसिद्धी दिली. त्यांचे हे वेब पोर्टल अनेक देशांमध्ये पहिले व वाचले जाते. मागील वर्षी हुंडा प्रतिबंधक कायद्यावर एक लेख प्रसारित केला त्यावर अनेक वाचकांनी छोटे छोटे लेख लिहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. त्यात दुसरे नांव आहे "अभूतपूर्व पार्ले" चा डिजिटल अंक! अभूतपूर्व पारर्लेचे संपादक श्री. अनिल हर्डीकर यांनी सुद्धा आपल्या स्पर्धांच्या परीपत्रकांना योग्य प्रसिद्धी देऊन मोलाचे सहकार्य केले आहे. तसेच भविष्यातही असे सहकार्य मिळेल याची खात्री आहे.



### साने गुरुजींचे विचार

मातृभूमीचे प्रेम हे मातृप्रेमाचे एक भव्य आणि विशाल स्वरुप आहे.
आई माझा गुरू, आई कल्पतरू।
सुखाचा सागर आई माझी।।
प्रीतीचे माहेर, मांगल्याचे सार।
अमृताची धार, आई माझी।।
मातेच्या मोहाने मी स्वातंत्र्य युध्दात पडणार नाही,
म्हणून माझी आई माझ्या जीवनातून लवकर निघून गेली.
आता भारतमाता हीच माझी माता
तिची सेवा करता करताच ह्या देहाचे सोने होऊ दे

**– वंदे मातरम्**

## जनतेचे सहकार्य

संस्था करीत असलेल्या कार्याचा जनतेकडून गौरव होत असून, सर्व स्तरावर सक्रिय सहकार्य लाभत आहे. जनमताची शक्ती चळवळीच्या पाठीशी असल्यामुळे अपेक्षित बदल घडवून आणण्यात आणि भारतीय माता भगिनींचे कष्ट, दु:ख दूर करून त्यांना सुरक्षित जीवन देण्यात यश नक्कीच लाभेल अशी खात्री वाटते. समाज परिवर्तन धीम्या गतीने कां होईना घडत असल्याचे खालील प्रयत्नावरून दिसून येईल.

तरुणांना मार्गदर्शन करण्याच्या कार्यक्रमात आमच्या आवाहनाला तरुणांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला असून विषेश करुन इंजिनियरिंग व मेडिकल कॉलेजमधील विद्यार्थ्यांनी हुंडा देणार नाही घेणार नाही अशी सामुदायिक प्रतिज्ञा उत्स्फूर्तपणे घेतली आहे.

विविध महाविद्यालयांच्या प्राचार्याचे सक्रिय सहकार्य लाभले असून त्यांच्या विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतिसाठी त्यांची तळमळ अभिमानास्पद व उपकारक आहे. या सर्व प्राचार्यांचे आम्ही ऋणी आहोत. असेच सहकार्य आम्हांस सदैव लाभेल असा विश्वास आहे.

संस्थेच्या प्रचार कार्याचे परिणाम उशीरा, पण दिसू लागले असून ज्या समाजात हुंडा या अनिष्ट प्रथेस प्रतिष्ठा प्राप्त झाली होती, त्याच समाजात जाहीर सभा घेऊन हुंडाविरोधी विचार मांडले जाऊ लागले आहेत. तसेच तरुणांनी सामूहिक प्रतिज्ञा घेऊन या दृष्ट रुढीस ठाम विरोध दर्शविला आहे. आपण असेच कार्य सातत्याने करीत राहिल्यास हुंडा या दृष्ट रुढीपासून समाजाची सुटका करु शकू असा विश्वास आहे.

## ऋणनिर्देश आणि आभार

संस्थेचा ५० वा अहवाल तसेच पारितोषिक प्राप्त लाघुकथांचा संग्रह “शलाका” आणि “दामू .. साने गुरुजींचा धडपडणारा मुलगा” (आवृत्ती दुसरी) अशी चळवळीची दोन्ही प्रकाशने अतिशय देखणी झाली आहेत. त्यांचे छपाई काम इम्प्रेशन ग्राफिक्स या छापखान्याचे श्री नितीन सोमण यांनी केले त्यामुळे त्यांचे सहकार्य मोलाचे आहे. निहार ग्राफिक्सचे पूर्णिमा नार्वेकर व चंद्रसेन साळवी यांनी वार्षिक अहवालाचे डी. टी.पी. तसेच पेज सेटिंग करण्याचे काम करून सहकार्य केले. तसेच जाणीव जागृतीचे जे कार्यक्रम ऑनलाईन आणि प्रत्यक्ष झाले, ते आयोजित करण्यासाठी ज्या महाविद्यालयांनी व शैक्षणिक संस्थांनी बहुमोल सहकार्य केले त्यांचे आम्ही सदैवी ऋणी राहू. साठ्ये महाविद्यालयाने दरवर्षी अंतरमहाविद्यालयीन विविध स्पर्धा, हुंडाविरोधी रॅली आणि युवा दिनाचा कार्यक्रम आयोजित करण्यासाठी सभागृह उपलब्ध करुन मोलाचे सहकार्य केले आहे. तसेच अहवालाचे वर्षी ज्या देणगीदारांनी संस्थेला आर्थिक सहाय्य केले, त्यांचे सुद्धा आम्ही आभारी आहोत. गेली ४० वर्षे चळवळीचा सारस्वत बँकेशी ग्राहक म्हणून तसेच एका संवेदनशील विषयावर कार्यरत सामाजिक संस्था या नात्याने घनिष्ट संबंध निर्माण झाले आहेत. अहवालाचे वर्षी सारस्वत बँकेचे अनुदान स्वरूपात आर्थिक सहाय्य लाभले आहे. संस्था सदैव या सर्वांची ऋणी राहील.

# आपले सहकार्य

कोरोना महामारीमुळे झालेल्या लॉकडाऊन काळात महिलांवरचे अत्याचार विशेषतः कौटुंबिक हिंसाचाराच्या घटना फार मोठ्या प्रमाणात वाढल्या. त्या काळात बालविवाहाचे प्रमाण तसेच मुलींच्या इच्छेविरुद्ध लग्न लावून देण्याचे प्रमाण वाढले. ग्रामीण भागातच नाही तर शहरी व निमशहरी भागातही अशी बेकायदेशीर कृत्ये व गुन्हेगारीचे प्रकार वाढले आहेत. शासनाने ५० लोकांच्या उपस्थितीत लग्न समारंभाला दिलेली परवानगी अशा प्रवृत्तींच्या पालकांच्या पथ्यावर पडली. मुलीचं ओझं कमी करायला त्यांना ही सुवर्ण संधीच ठरली. लग्नाचा खर्च अचानक कमी झाल्याने अक्षरशः तीन चार दिवसात ठरवून लग्नं पार पाडली गेली. 'मुलगी शिकली प्रगती झाली' या घोषवाक्याचा फज्जा उडाला आहे. सुशिक्षित तरुण मुलींच्या आत्महत्यांचा आलेख भयावह परिस्थिती दर्शवतो आहे. आता पुनश्च हरीओम म्हणत या दुष्ट प्रवृत्तींचा नायनाट करण्यासाठी पुन्हा एकदा दंड थोपटून सर्व शक्तीनिशी सुरुवात करण्याची नितांत गरज आहे.

मित्रांनो, विज्ञान तंत्रज्ञानाच्या या आधुनिक युगात समाजमनावरील धर्मप्रभाव आणि धर्मांधता काही कमी होतांना दिसत नाही. याचा परिणाम फार गंभीर आहे. समाज सुधारणेचे, हुंड्यासारख्या दुष्टरुढी परंपरांना नष्ट करण्याचे विचार अडगळीत जात आहेत. अशा परिस्थितीत या चळवळीचे यश आपल्या सहकार्यावर अवलंबून आहे. हुंडा विरोधी चळवळ ही घराघरातून व्हावयास हवी. समाजातील हे दुखणे दूर करण्यासाठी सर्वांनी पुढे सरसावले पाहिजे. समाजातील परिस्थितीकडे डोळसपणे पाहून ''मला काय त्याचे!'' ही वृत्ति न अंगीकारता निकोप वातावरण निर्मितीसाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावयास हवेत. आपण स्वतः अशा अपप्रवृत्तीपासून दूर राहिले पाहिजेच, परंतु आपल्या मित्रपरिवारांचेही मतपरिवर्तन करावयास हवे. संस्थेच्या उपक्रमांस यथाशक्ति सहाय्य करावे. अंधपणाने चालीरीतीचा पाठपुरावा न करता अथवा धर्माच्या नावाखाली चालणाऱ्या अघोरी कृत्याला पाठिंबा न देता पुरोगामी व शास्त्रीय विचारसरणीचा अवलंब करावा. लोभी व स्वार्थी वृत्तीला तिलांजली दिली आणि माणुसकीशी नाते जोडले तर अनेक मानवनिर्मित समस्या नष्ट होतील. मित्रांनो, आम्ही फक्त आपल्या सद्सद्विवेक बुध्दीला जागे करु इच्छितो. आपल्या हातून नक्कीच चांगले कार्य होईल.

धन्यवाद!

विलेपार्ले (पूर्व), मुंबई

१ मे २०२४

कार्यकारी मंडळाकरिता

**आशा कुलकर्णी (महासचिव)**

**हुंडाविरोधी चळवळ, मुंबई**



असं जगा की जणू उद्या तुमचा मृत्यु अटळ आहे आणि ज्ञान असं आत्मसात करा की तुम्ही खूप वर्षे जगणार आहात.

**– महात्मा गांधी**

# सन्मानपत्र



ॲड. सुजाता माने केंद्रे

मा. ॲडव्होकेट सुजाता माने केंद्रे, २०२३ सालाचा लातूर जिल्ह्यासाठी असलेल्या कै. सौ. राधाबाई कुलकर्णी विधायक कार्यकर्ती पुरस्काराने आपणास सन्मानित करताना आम्हा सर्वांना अतिशय आनंद होत आहे. मुळातच आपण एक लढाऊ वृत्तीच्या कार्यकर्त्या आहात, त्यात आपण ज्या विषयावर लढा देत आहात तो समाजाच्या दृष्टीने कमी महत्वाचा आणि काहीसा दुर्लक्षित त्यामुळे महिला व बाल हक्क संरक्षणासाठी आपण दिलेला लढा आणि मिळवलेल्या यशासाठी घेतलेल्या कष्टांना आमचे आदरपूर्वक वंदन!

आपल्या कार्यासाठी पूरक अशा आपण घेतलेल्या कायदा आणि समाजशास्त्राच्या उच्च शिक्षणाचा उपयोग अर्थार्जनासाठी न करता समाजासाठी करायचा तर कुटुंबियांची साथ महत्वाची असते, ती आपल्याला आई वडिलांनी कधीच कमी पडू दिली नाही. जीवनात अनेक कठीण प्रसंगांना सामोरे जात असतांनाही मनोधैर्य ढळू न देता आपण समाजकार्याची कास कधीच सोडली नाहीत. आपले संघर्षमय जीवन एखाद्या कादंबरीचा विषय ठरावा असे आहे.

महिला व बाल हक्क संरक्षण क्षेत्रात आपण १९९५ साली समुपदेशकाच्या भूमिकेतून कार्य सुरु केलेत. आज आपल्या गाठीशी २७ वर्षांचा प्रदीर्घ अनुभव आहे. लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम २०१२ आणि कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा २००५ तसेच मानवी तस्करी कायदा या अतिशय महत्वाच्या दोन कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी आपण प्रदीर्घ काळ विविध माध्यमांतून आणि उपक्रमांतून प्रयत्नरत आहात. यासाठी शासनाच्या महत्वाच्या विविध समित्यांवर सुद्धा आपली तज्ज्ञ म्हणून नेमणूक झाली आहे. अनेक महिला आणि बालकांना कायद्याचे संरक्षण व न्याय मिळवून देण्यात आपण यशस्वी झाला आहात. तसेच जाणीव जागृतीच्या कार्यक्रमातून, कायदेविषयक कार्यशाळातून आपण लोकशिक्षणाचे भरीव कार्य केले आहे.

महिला व बाल विकास क्षेत्रातील आपल्या या भरीव योगदानाबद्दल आपण अनेक पुरस्कारांच्या मानकरी ठरल्या आहात. नुकतेच महाराष्ट्र दिनानिमित्ताने आपल्याला शासनाच्या जिल्हास्तरीय पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. आपण देत असलेला हा लढा भविष्यात सामाजिक कार्यकर्त्यांना नक्कीच मार्गदर्शक ठरेल असा आम्हाला विश्वास वाटतो. आपल्या सेवाव्रताला सुयश लाभावे यासाठी हुंडाविरोधी चळवळीतर्फे आणि कुलकर्णी कुटुंबियांतर्फे मन:पूर्वक शुभेच्छा !



आयुष्यात प्रत्येक जण महान गोष्टींची निर्मिती करू शकेल असे नाही. मात्र छोट्या गोष्टी अत्यंत प्रेमाने साध्य करण्याची क्षमता मात्र प्रत्येकातच असते.

**– मदर तेरेसा**

# सन्मानपत्र



उमेश घेवरीकर

मा. श्री. उमेश गोपीनाथ घेवरीकर, २०२३ सालाच्या सानेगुरुजी आदर्श शिक्षक पुरस्काराने आपणास सन्मानित करताना आम्हा सर्वांना अतिशय आनंद होत आहे. एका यशस्वी शिक्षकाच्या ठायी असणारा ध्येयवाद आणि आपल्या विद्यार्थ्यांप्रती असणारी जबाबदारीची, मायेची भावना हे गुण आपल्यात ठासून भरले आहेत. शिक्षण प्रवाहाशी निगडीत असे अनेक उपक्रम राबवून एक उपक्रमशील शिक्षक म्हणून शालेय शिक्षण क्षेत्रात आपण नाव कमावले आहे. शिकणे आणि शिकविणे हे एक पवित्र कार्य आपण मानता आहात. केवळ वर्गात बसून पुस्तकातील धडा वाचणे म्हणजे शिकविणे नाही तर वर्गाबाहेर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्व विकासासाठी प्रयत्नशील राहणे हे शिक्षकाचे आद्य कर्तव्य मानून आपण शाळेत साहित्यिक, संशोधक, नाट्य प्रशिक्षक, सायबर तज्ज्ञ, अभिनेते, कवी अशा विविध क्षेत्रातील मान्यवरांचे विद्यार्थ्यांशी संवाद आयोजित करता. शाळाबाह्य मुलांना शाळेत दाखल करून घेता.

आपण उपक्रमशील शिक्षक तर आहातच परंतु एक संवेदनशील कवी, उत्तम लेखक, यशस्वी अभिनेते आणि दिग्दर्शक आहात. तसेच बालनाट्याचे लेखन दिग्दर्शन आणि राज्यस्तरीय बालनाट्य महोत्सवात २० पेक्षा अधिक बालनाट्यांचे सादरीकरण करून पारितोषिकेही मिळविली आहेत. अनेक विद्यार्थ्यांना दूरदर्शन वरील कार्यक्रमात संधी मिळवून दिली आहे. ग्रामीण भागातील नाट्यविषयक कार्यासाठी पं. सत्यदेव दुबे यांचे स्मरणार्थ देण्यात येणाऱ्या रंगकर्मी पुरस्काराचे आपण पहिले मानकरी आहात. ''कवितांची बाग'' या अभिनव उपक्रमाला विद्यार्थी व पालकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून प्रतिथयश कवींनी या उपक्रमाचे कौतुक केले आहे, आणि राज्यातील अनेक शाळांनी या उपक्रमाचे अनुकरण केले आहे. विज्ञान विषयक चालता बोलता, आकाश दर्शन, विज्ञान मेळावे इत्यादी उपक्रमांतून आपल्या प्रयत्नांनी विद्यार्थ्यांचा वैज्ञानिक दृष्टीकोन प्रगल्भ होत आहे.

विद्यार्थी आणि शिक्षकांच्या साहित्य विषयक अभिव्यक्ती असणाऱ्या "किलबिलाट" या वार्षिक अंकाचे आपण संपादक आहात. तसेच आपण १४ व्या अखिल भारतीय बाल कुमार साहित्य संमेलनाचे यशस्वी आयोजन आपल्याच शाळेत केले. आपल्या प्रकाशित साहित्यात उत्कृष्ट साहित्य पुरस्कार प्राप्त "विजेता" हा बालकथा संग्रह आणि "हृदयस्थ" व "शिक्षणाच्या कविता" या दोन कविता संग्रहांचा समावेश आहे. याशिवाय लघुपट निर्मितीतही आपले उल्लेखनीय योगदान असून आपण शाळेतील विद्यार्थ्यांना सोबत घेऊन १५ पेक्षा अधिक सामाजिक-शैक्षणिक लघुपटांची निर्मिती केली आहे आणि राज्यस्तरीय पुरस्कारही मिळविले आहेत. आपल्या या शैक्षणिक क्षेत्रातील अनमोल अशा योगदानाला आमचा मानाचा मुजरा. आपला हा प्रेरणादायी आदर्श तमाम शिक्षक वर्गाला आणि समाजाला दिशादर्शक ठरेल! हुंडाविरोधी चळवळीतर्फे आणि कुलकर्णी कुटुंबीयांतर्फे अनेक शुभेच्छा !

# सन्मानपत्र



डॉ. रागिणी पारेख

मा. प्रा. डॉ. रागिणी हसमुखराय पारेख, २०२३ सालाच्या कै. शकुंतला परळकर सेवाव्रती डॉक्टर पुरस्काराने आपणास सन्मानित करताना आम्हांस अतिशय आनंद होत आहे. नेत्रशल्य चिकित्सा आणि दृष्टिदान क्षेत्रातील एक तज्ज्ञ म्हणून आपले योगदान उल्लेखनीय आहे. २८ वर्षांहून अधिक काळाचा आपला गाढा अनुभव आणि अचूक निदान यामुळे तसेच रुग्णांप्रती असलेली आपली निष्ठा या गुणांमुळे आपण तरुणवयातच अतुलनीय असे यश प्राप्त केले आहे.

आपण ग्रांट मेडिकल कॉलेजच्या नेत्र विभागाच्या प्रमुख पदावर कार्यरत आहात. सर जे.जे. रुग्णालय समूह शासकीय असल्याने येथे आर्थिक दृष्ट्या दुर्बळ वर्गातील रुग्णांची संख्या अधिक असते. आधीच जीवनातील पराकोटीच्या संघर्षामुळे पिचलेल्या या रुग्णांना मायेची व प्रेमाच्या ओलाव्याची गरज असते, हे जाणून आपण त्यांच्यावर उपचार करता. केवळ नोकरी म्हणून नाही तर मोकळ्या वेळात आणि सुट्टीच्या दिवशी सुद्धा गरीब आणि गरुजू रुग्णांची नेत्रसेवा आपण अविरत करीत असतां.

आजवर मागील १८ वर्षात एक दोन नाही तर तब्बल ५८३ नेत्र शिबिरांमधून शे-दोनशे नाही तर ७७,९१० यशस्वी नेत्र शस्त्रक्रिया आपण केल्या आहेत. हा एक जागतिक विक्रमच म्हणावा लागेल. मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र अभियानात आपला सिंहाचा वाटा आहे. १०० प्रसंगी एकाच दिवसांत १०० मोतीबिंदू शस्त्रक्रिया करणाऱ्या भारतातील आपण एकमेव महिला नेत्र शल्य चिकित्सक आहात. आणि असे अनेक विक्रम आपल्या नांवावर आहेत. महाराष्ट्रातील जवळ जवळ सर्वच जिल्ह्यांतून ग्रामीण आणि आदिवासी क्षेत्रातील गरजूंसाठी, विशेषतः चंद्रपूर जिल्ह्यातील आनंदवन या कुष्ठरोग आश्रमातील कुष्ठरोगी तसेच एच.आय.व्ही. बाधितांसाठी दृष्टीदोष दूर करणाऱ्या आपण देवदूतच आहात. या नेत्र शिबिरात "पिक अप कॅम्प" ही संकल्पनाही आपण प्रभावीपणे राबवलीत, या उपक्रमा अंतर्गत महाराष्ट्राच्या ग्रामीण भागांतून अनेक रुग्णांना मुंबई मध्ये जे.जे.रुग्णालयात आणून त्यांच्यावर आपण तातडीने उपचार करून त्यांना दृष्टीहीन होण्यापासून वाचविलेत. आपण केवळ प्रौढांसाठीच नव्हे तर १५०२ शाळांमधून साडे सात लाख शालेय विद्यार्थ्यांना तपासून ९१,००० मुलांना चष्मा वापरण्याचा सल्ला देऊन ११८१ मुलांवर शस्त्रक्रिया केलीत आणि त्यांना दृष्टी दोषाच्या गंभीर परिणामांपासून वाचविलेत. दूरदर्शन सारख्या प्रभावी माध्यमातून आपण नेत्र आरोग्याचे जाणीव जागृतीचे अनेक कार्यक्रम राबवलेत.

वैद्यकीय शिक्षण क्षेत्रात अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर दोनशे हून अधिक परिषदांतून आपण हजारो विद्यार्थी आणि परिचारिकांचे मार्गदर्शन केले आहे. प्रत्यक्ष प्रात्यक्षिकातून मोतीबिंदू शस्त्रक्रियेचे कौशल्य शिकवणाऱ्या भारतातील आपण एकमेव महिला नेत्र शल्य चिकित्सक आहात. आपल्या या अतुलनीय योगदानाबद्दल अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी आपण सन्मानित आहात. "हे कंकण करी बांधियले जनसेवे जीवन दिधले'' हे सानेगुरुजींचे शब्द आपला खरा परिचय देतात. वैद्यकीय आणि सामाजिक क्षेत्रातील आपले हे अमूल्य योगदान नव्या पिढीस प्रेरणा देणारे तसेच दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक ठरो! आपल्या या सेवाव्रताला सुयश लाभो हीच सदिच्छा!

# सन्मानपत्र



लेफ्ट. अपूर्वा गीते

आज युवादिनी स्वामी विवेकानंदांच्या जयंती निमित्त आणि हुंडाविरोधी चळवळीचे प्रणेते, स्वातंत्र्य सैनिक व साने गुरुजींचे मानसपुत्र दा.ब. उपाख्य मामासाहेब कुलकर्णी यांच्या स्मृतीप्रित्यर्थ "लेफ्टनंट अपूर्वा वैशाली नारायण गीते'' यांना मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर भारतीय नौसेनेत लेफ्टनंट पदावर पोचणारी महाराष्ट्रातील पहिली महिला नौसेना वैमानिक होण्याचे यश मिळविल्याबद्दल "सानेगुरुजी युवा पुरस्कार'' प्रदान करून गौरवताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे.

अपूर्वाचा जन्म १२ जुलै १९९७ रोजी रायगड जिल्ह्याच्या खोपोली गावात झाला. शालेय शिक्षण डोंबिवलीच्या ओंकार इंटरनेशनल स्कूल मधून तर उच्च माध्यमिक शिक्षण मुलुंडच्या वझे केळकर महाविद्यायातून पूर्ण केले. पुढे उच्च शिक्षण नेरूळ, नवी मुंबईच्या डी.वाय.पाटील महाविद्यालयातून संगणक शास्त्रात बी.ई.ची पदवी संपादन करून पूर्ण केले. अपूर्वा जून २०१९ पासून भारतीय नौसेनेत लेफ्टनंट पदावर कार्यरत आहे.

आई वैशाली आणि वडील नारायण गीते यांनाच आपला आदर्श मानणारी अपूर्वा सांगते, "दर दिवशी प्रत्येक क्षण हा काही ना काही संघर्षाचा असतो, भारतीय नौसेनेत पदोपदी नवीन शिकतेय." अर्थातच हे तिच्या आई-वडिलांच्या प्रेरणेनेच ती साध्य करत आहे आणि पुढे भविष्यातही करणार आहे हे ओघाने आलेच.

सशत्र दलांमध्ये परिवर्तन घडवून आणण्याच्या कामी भारतीय नौदल नेहमीच आघाडीवर राहिले आहे. गुजरात राज्यातील पोरबंदर येथे इंडिअन नेव्हल एअर स्क्वॉड्रन वसलेली आहे. अत्याधुनिक डॉर्नियर-२२८ या सागरी टेहळणी विमानांचा या स्क्वॉड्रनमध्ये समावेश आहे. येथे ३ ऑगस्ट २०२२ रोजी घडलेल्या एका ऐतिहासिक घटनेतील यशस्वी मोहिमेत सामील होण्याचे भाग्य अपूर्वाला लाभले. उत्तर अरबी समुद्रातील सागरी शोध आणि टेहळणी मोहिमेसाठी संपूर्ण महिला चमूची निवड करणे हा भारतीय नौदलाचा अनोखा उपक्रम होता. डॉर्नियर-२२८ या विमानाच्या सहाय्याने पाच महिला अधिकाऱ्यांनी सागरी शोध आणि टेहळणी मोहीम यशस्वी करून एक नवा इतिहास रचला आहे. या महिला चमूमध्ये अपूर्वाची निवड झाली, ही अभिमानास्पद बाब आहे. अशा अनेक महत्वाच्या आणि कठीण मोहिमा भविष्यात अपूर्वाला पार पाडायच्या आहेत. त्यासाठी अपूर्वाला लाख लाख शुभेच्या आणि आशीर्वाद !

अपूर्वाच्या भारतीय नौदलातील यशामुळे जास्तीत जास्त मुलींनी प्रेरणा घ्यावी आणि भारताच्या सीमा सुरक्षेचे स्वप्न बघावे आणि ते पूर्ण करावे हेच अपूर्वाचे स्वप्न आहे. हे तिचे स्वप्न, ही तिची अपेक्षा पूर्ण व्हावी तसेच अपूर्वाने भारतीय नौदलात उत्तरोत्तर प्रगती करून सर्वोच्च पदावर पोहचावे यासाठी हुंडाविरोधी चळवळीतर्फे आणि कुलकर्णी कुटुंबियांतर्फे मन:पूर्वक शुभेच्छा !

# सन्मानपत्र



श्वेता बर्वे

आज युवादिनी स्वामी विवेकानंदांच्या जयंती निमित्त आणि हुंडाविरोधी चळवळीचे प्रणेते, स्वातंत्र्य सैनिक व साने गुरुजींचे मानसपुत्र दा.ब. उपाख्य मामासाहेब कुलकर्णी यांच्या स्मृतीप्रित्यर्थ "श्वेता धनश्री श्रीनिवास बर्वे" यांना मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर स्वत:च्या संशोधनातून सुपारीच्या विऱ्यापासून चप्पल बनवून उत्पादनाचे पेटंट मिळविण्यात यश मिळविल्याबद्दल "सानेगुरुजी युवा वैज्ञानिक पुरस्कार" प्रदान करून गौरवताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे.

श्वेताचा जन्म २३ डिसेम्बर २००० रोजी कोकणातील सावंतवाडी येथे झाला. प्राथमिक शिक्षण तळकट येथील जिल्हा परिषद शाळेत, माध्यमिक शिक्षण बांदा येथील खेमराज मेमोरिअल इंग्लिश स्कूल मध्ये, उच्च माध्यमिक शिक्षण गोव्यातील पेडणे हायर सेकंडरी स्कूल मध्ये झाले. पुढे वाणिज्य शाखेत सावंतवाडी येथील सर पंचम खेमराज महाविद्यालयातून श्वेताने पदवी संपादन केली. श्वेताच्या आई वडिलांचा सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सुपारी, नारळ आणि आंबा बागायत हा मुख्य व्यवसाय आहे. कोकणातील सुपारी झाडापासून मिळणाऱ्या विऱ्या केवळ टाकाऊ किंवा जळणासाठी वापरल्या जातात. २०१९ च्या लॉकडाउन काळात सहज प्रयोग करत असताना सुरुवातीपासून आर्ट आणि कलाकुसर करण्याची आवड असलेल्या श्वेताने स्वत:साठी सुपारीच्या वेस्ट मधून चप्पल बनवली. त्यामुळे आपल्या बागेत फुकट जाणाऱ्या सुपारीच्या झाडावरील विऱ्यापासून उत्तम पर्यावरण पूरक चप्पल तयार करण्याची कल्पना तिला सुचली. त्या दृष्टीने श्वेताने प्रयत्नपूर्वक चप्पल बनवली. डॉ. रघुनाथ माशेलकर यांचे सहकारी शास्त्री सरांनी श्वेताच्या संशोधनाला पाठबळ दिले आणि या चपलांच्या उत्पादनाचे पेटंट मिळवण्यासाठी योग्य ते मार्गदर्शन केले.

आता लवकरच कोकणात दोडामार्ग येथे श्वेता या पर्यावरण पूरक चपलांचा उद्योग उभारणार आहे. त्यामुळे कोकणात सुपारीच्या बागांमधून फुकट जाणाऱ्या विरीलाही आता महत्व प्राप्त होणार असून त्यातून रोजगार निर्माण होणार आहे. श्वेताला लघुउद्योजिका बनण्याच्या मार्गावर सुयश लाभो यासाठी हुंडाविरोधी चळवळीतर्फे आणि कुलकर्णी कुटुंबियांतर्फे मन:पूर्वक शुभेच्छा !



मी हे करू शकत नाही असं कधीही म्हणू नका, कारण तुमच्या अंर्तमनात प्रचंड शक्ति आहे. या शक्तिच्या मदतीनं तुम्ही अशक्य वाटणारं कामही शक्य करून दाखवू शकता.

– **स्वामी विवेकानंद**

# Book Mark

*Woman is the companion of Man gifted with equal mental capacities & she has equal right of freedom & liberty with him.*

- Mahatma Gandhi



Baa & Bapu's 150th Birth Anniversary

जो नौजवान शादी के
लिए दहेजकी शर्त
रखते है वे
अपनी शिक्षाको,
अपने देशको
कलंकीत करते है,
नारीत्वका अपमान
करते है ।

- महात्मा गांधी



*If you ever feel afraid of anything always turn round and face it. Never think of running away*

ISSUED BY :

ANTI DOWRY MOVEMENT, BOMBAY
4/50, Vishnu Prasad 'B' CHS,
Shahaji Raaje Marg, Vile Parle (East),
Mumbai - 400 057. Tel. : 022-2683 6834/6132
Email : antidowry498a@gmail.com
www.antidowrymovement.com


कुंडली तो मिली मगर...
RESERVE BANK OF INDIA
GUARANTEED BY THE CENTRAL GOVERNMENT
100
I PROMISE TO PAY THE BEARER THE SUM OF ONE HUNDRED RUPEES
GOVERNOR
890580
दहेज के
कारन जली